
डॉ. नितीन मोरे

# मी मेल्यानिया बोलते



# मी मेल्यानिया बोलते..!

## (वाचा+ऐका+बघा)

डॉ. नितीन मोरे

या पुस्तकातील निळया शब्दांवर क्लिक करताच

ऑडिओ व्हिडिओ चालू होतील.

ई साहित्य प्रतिष्ठान

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# मी मेल्यानिया बोलते..!

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मी मेल्यानिया बोलते..!

लेखक: डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ९ जुलै २०२१

©esahity Pratishthan®2021

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत: आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे तिसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# मी मेल्यानिया बोलते..!

डॉ. नितीन मोरे

# अर्पण पत्रिका

लिहिण्यापेक्षा प्रकाशित करणे नि प्रकाशित करण्यापेक्षा वाचकांपर्यंत पोहोचणे.. या एकाहून एक कठीण पायऱ्या ओलांडून मायमराठीची सेवा करणारी ई साहित्य ही प्रकाशन संस्था. ई साहित्यच्या श्री. सुनीळ सामंत यांना हे तिसावे पुस्तक सादर आणि सप्रेम अर्पण.

# प्रस्तावना

## मी मेल्यानिया बोलते..!

अमेरिका ह्या स्वप्नभूमीत स्वप्न भंग करणाऱ्या गोष्टी घडल्या नुकत्याच. अर्थात स्वप्नं भंगली ती कोणाची हा वादाचा मुद्दा होऊ शकतो पण ट्रंपतात्यांनी आपल्याला चार विरंगुळ्याचे क्षण दिले हे निरपवाद. तर मेल्यानिया म्हणजे मिसेस ट्रंप आपले भाषण स्वातंत्र्य टिकवून बोलू लागल्यात.. सत्तेवर असताना कदाचित त्याची किंमत कळत नसेलही पण पायउतार झाल्यावर सामान्य माणूस म्हणून ती कळली असेल. मुद्दा आपला तो नाही.

आपला उद्देश चार घटका विरंगुळा ..

तिथे मेल्यानिया तर कामी आलीच. आणि हल्लीच्या पिढीतले यू ट्यूब नि वेगवेगळ्या ठिकाणचे सोशल मिडियातले स्टॅटस ही. शाळकरी मुलीचा माझा आवडता नवरा हा निबंध आहे यात तर आयुष्याच्या शेवटी जीवनाशी शर्यत लावलेली आजी ही. लग्नाळू मुलीची कांदेपोह्यांची गोष्ट आहे नि काळानुरूप बदलणारी राणीची पत्रे आहेत.. जुन्या जमान्यातील जाहिरातीतून उभे राहिलेले

मध्यमवयीन गृहिणीचे सुखचित्र.. आणि पत्नीधर्म सांगणारे स्तोत्र ही..

ई साहित्यवर हा ऑडिओ/ व्हिडिओ बुक स्वरूपातही माझा पहिलाच संग्रह येत आहे. ई साहित्यच्या ऑडिओ/व्हिडिओ विभागप्रमुख अंजना लगस यांचे खास आभार.

दोन्ही प्रकार वाचक आणि श्रोत्यांच्या पसंतीस उतरावेत अशी आशा आहे.

डॉ. नितीन मोरे

अनुक्रम

१. मी मेल्यानिया बोलते..!

२. माझे यू ट्यूब चॅनेल

३. मी आणि माझे स्टेटस!

४. माझा आवडता नवरा

५. कांदेपोह्यांच्या गोष्टी!

६. राणीची दोन पत्रे

७. एका डासीचे मनोगत

८. एक सुखचित्र

९. पत्नीधर्माचे स्तोत्र

१०. एका शर्यतीची गोष्ट

ऑडिओ व्हिडिओ अनुक्रम


1 मनोगत

2 मी मेल्यानिया बोलते..!

3 माझे यू ट्यूब चॅनेल भाग - १

4 माझे यू ट्यूब चॅनेल भाग - २

5 मी आणि माझे स्टेटस ! भाग - १

6 मी आणि माझे स्टेटस ! भाग - २

7 माझा आवडता नवरा

8 कांदेपोह्यांच्या गोष्टी! भाग - १

9 कांदेपोह्यांच्या गोष्टी! भाग - २

10 कांदेपोह्यांच्या गोष्टी! भाग - ३

11 कांदेपोह्यांच्या गोष्टी! भाग - ४

12 कांदेपोह्यांच्या गोष्टी! भाग - ५

13 राणीची दोन पत्रे पत्र क्र. १ - भाग १

14 राणीची दोन पत्रे पत्र क्र. १ - भाग २

15 राणीची दोन पत्रे पत्र क्र. २

16 एका डासीचे मनोगत

17 एक सुखचित्र

18 पत्नीधर्माचे स्तोत्र

19 एका शर्यतीची गोष्ट  भाग -  १

20 एका शर्यतीची गोष्ट  भाग - २

# मी मेल्यानिया बोलते!

ऑडिओ व्हिडिओ –

मी मेल्यानिया बोलते..!

रामराम मंडळी. म्या मेल्यानिया. ट्रंपतात्यांची मिसीस. मेल्यानिया ट्रंप. ओळखलं की न्हाई? ओळखनारच. वॉशिंगटन ग्रामपंचायतच समद्या जगात फेमस हाय. आनि आमचे हे पन. सर्वांचे लाडके ट्रंपतात्या. आमची घोषनाच व्हती 'भाऊ काका मावशी आत्या, एकच एक ट्रंप तात्त्या!' अन् म्या त्यांच्यामुळे फेमस.. फस्स लेडी. मला किनी झगे घालून मिरवायची हाऊस न्हाई. पन हे पांढ्रं हाऊस हाय ना.. हिकडं आलं की कुनीबी फेमस हूनच जातं बगा.. हाऊस असो की नसो. तशी म्या पन झाले.. झाले म्हना.. चार वरीस हितं यून. ट्रंपतात्यांच्याकडं ही मानसांची रीघ. आन् तात्या काय बोलायला फटकळ. श्येतातल्या कोयत्यावानी जीब चालती त्यांची. त्यामुळे सारे पेपरवाले पन खूश. मग येक दिस जानार न्हाई की ह्यांचा फोटो पहिल्या अन् माजा तिसऱ्यावर येनार न्हाई.

.. पन दिस कसे झटझट जातात न्हाई .. कोरोणा आला तिकडून चायनामधून.. त्यात ही ग्रामपंचायतीची सरपंचपदाची विलेक्शन पन आली. तात्या कसले कोरोणाला दाद देत्यात.. पन विलेक्शनचं तसं न्हाई ना..

म्हंजे विलेक्शन झाली. ट्रंपतात्यांचा निकाल लागला म्हनं. बिडेनभौ लांडीलबाडी करन्यात हुशार. अवं झेडपीच्या साळंत व्हता तवापासून फेमस त्यासाठी तो. जिंकला म्हनतात विलेक्शन. जिंकनार न्हाई तर काय? काय बी करून जिंकायचं म्हनलं तर जिंकनारच.. उगाच न्हाई सांगत. चार वरीसपूर्वीचा आनभव हाये त्यावरून सांगते. हिलरीबाईला धूळ चारली तवाची आटवण इसरली न्हाई अजून. पन यावेळी बिडेनभौ फुडं गेले. म्हंजे तसा रिझल्ट डिक्लेर झाला. म्या म्हनलं हे शक्य न्हाई. तात्या विलेक्शन कसे हारू शकतात? पन न्हाई. समदे म्हनाला लागले.. हारले म्हनून. लोकं बोलाया लागले काहीबाही. चार वरीस ज्यांना मटेरियल दिलं ते पेपर वाले म्हनाया लागले .. ट्रंपतात्या पांढ्र घर सोडा..

म्या तात्याना म्हनली, तर तात्या गानं गाया लागले .. 'कुच तो लोग कहेंगे.. लोगोंका काम है कहना ..!' म्हनलं,'अवो, तयारीला

लागू.. बांदाबांद करू समदी. चार वरीस ह्या घरात ऱ्हायलो तर सामान बी लय जमतं की न्हाई.'

बाकी म्या समदं प्याकिंग करीन पन तात्यांची कागदं त्यानलाच करावी लागनार की न्हाई?

तात्यांना म्हनली तर ते म्हनले, 'चिक्कीखाऊ बिडेन लांडीलबाडी करून जिंकला. साळंत पण कॉपी करून पास झाला.. आता माझी कॉपी करून विलेक्शन जिंकाया झाला.. तू बस तिथं.. काय नाय ह्ये घर सोडायचं.. जिंकला त्यो न्हाई .. म्याच!' म्हनलं, 'अवो वरूण ऑर्डर आली.. आता काय करावं?'

तर तात्या बाजूच्या टेबलावर उबेच राह्यले अन् म्हनाले, 'अजून कोन हाय वर? माज्यावर कोन हाय? म्याच सर्वात वरती.. आन अजूनबी लोकं म्हनतात .. या वॉशिंगटन ग्रांपंचायतीचा इकास करायचा तर ट्रंपतात्याच हवे .. याठिकाणी म्या हे सांगू इच्छितो की.. हा इकास आम्हीच केला अन् आम्हीच करनार ..'

तात्यांची सवैच ती. कदी भाषन ठोकाया लागतील काय नेम न्हाई!

म्या म्हनली, 'अवं, त्ये लोकं काय आईकायचे न्हाईत. त्यो बिडेनभौ लय लबाड, बोक्यावानी. लोन्याचा गोळा पळवनारा. समदं सामानसुमान घ्यून दारात उबा ऱ्हाईल अन मग आपला

फजितवाडा व्हईल. न्हायतर पोलिस बोलविल. त्यापेक्षा आपन आपलं प्याकिंग करून ठिवू..'

तात्या म्हनले, 'मेल्यू ..'

हे लाडाचं नाव माजं..

'मेल्यू, चार वरसात तू काय शिकली न्हाई. हा ट्रंपतात्या काय हार मानत न्हाई .. माज्या डोसक्यात येक सॉलिड आयड्या हाय!'

म्हनलं असनार. मागच्या विलेक्शनला अशाच आयड्या काढल्या व्हत्या .. तवा आताबी आसनारच..

म्हनले, 'मेल्यू, लोकं कशाला ग्हाबर्तात?'

म्हनलं, 'कशाला काय? तुम्हालाच न्हवं का?'

तर म्हने, 'अगं, यंदाच्या सिजनला लोकं ग्हाबर्तात त्ये कोरोणाला..'

मला उमजलं, तात्यांच्या डोसक्यात कायतरी सॉलिड शिजलंय.. बटाट्यावानी.

म्हनाले, 'आइक.. आजचा वॉशिंगटन चौफेर वाच..'

म्या पाह्यलं तर पहिल्या पानावर बात्मी..

ट्रंपतात्या अजूनही कोरोणा पॉझिटिव्ह!

मला लै टेन्शन.

म्या म्हनली, 'आता वं?'

तात्या म्हनले, 'मेल्यू, कोरोणा मला ग्हाबर्तो..'

ह्ये बरीक खरं. मधे हॉस्पिटलातनं तात्या पळून आलेले.. मला वाटलं त्या ग्रामीण रूग्णालयातल्या करपलेल्या भाकऱ्यांना कंटाळून तात्या पळाले.. पन न्हाई! तात्यांचं डोस्कं तवापास्नं चाललेलं.

म्हनाले, 'म्या कोरोणाच्या जंतूला तंबी द्यून सांगितलं. नाकातोंडात गपगुमान पन जीवंत ऱ्हा.. म्या सांगीन तवर.'

सांगितलं आसनार. तात्यांचा काय नेम न्हाई बगा. 'मग आज त्यो रिपोर्ट छापून आनला.. आता बसा बोंबलत!'

'म्हंजी वो?'

'म्हंजी काय? मेल्यानी तू काय शिक्ली नाय बग.. आता बग.. बिडेनभौ आला की त्याचे पोलिस .. आपन आता कोरोणा पॉझिटिव्ह .. मी पॉझिटिव्ह म्हनून तू बी पॉझिटिव्ह ..'

मग तपकिरीची डबी हातात घेत बोलले..

'ही बग माझी बंदूक ..'

'अवं ही बंदूक? ही तर तपकिरीची डबी? आनि आता ही काय अजून एक वाईट सवै?'

'सवै नाय गं माजे बाय.. ह्ये आपलं शस्त्र! त्ये लोकं आले ना की तपकीर हुंगाची.. म्या अन तू. फटाफट शींक काढाची .. लोकं ग्हाबर्तात.. बिना मास्कवालेसे खुदा भी डर्ता है म्हनतात.. आपन तर कदी मास्क घालत न्हाई. कुनी आलं की कोंबा नाकात तपकीर .. काडा शींक फटाफट.. मग बग कसे पळतात त्यांच्या ह्याला पाय लावून..'

म्हनलं आमचे धनी लय हुशार खरे..

तर सांगत व्हती काय, शेवटी आमी पांढ्र घर सोडलं. लोकशाही म्हने! तात्या लय दिस डिप्रेशन मदे व्हते.. आता बरेत.. पत्ते कुटत बसतात पिंपळाच्या पारावर. पन सांगायचं त्ये एक.. जोवर चांगलं चाल्लंय ना तोवर येन्जॉय क्रून घ्या लोकहो. मोठमोठे तत्वज्ञानी सांगून गेले.. आजचा दिस उंद्या परत यायचा न्हाई. विंग्रजीत म्हनतात ना, लिव इन प्रेझेंट का कायतरी तसं..

.. तात्यांना मी म्हनलं.. 'काय चार वरीसं होती न्हाई ..'

तर तात्या फकस्त एक गानं आइकवतात..

'जिंदगी के सफर में गुजर जाते है वो मकाम .. वो फिर नहीं आते..'

.. आन पुन्यांदा पत्ते कुटाया निघून जातात.

# माझे यू ट्यूब चॅनेल..

ऑडिओ व्हिडिओ –

माझे यू ट्यूब चॅनेल भाग - १

माझे यू ट्यूब चॅनेल भाग - २

नमस्कार मंडळी.

मी ना मीना.. म्हणजे मी ना मीनाक्षी ..

मी ना एक मॅगी सुगरण .. म्हणजे दोन सेकंदात मॅगी बनवणारी .. आमच्या जेन ला स्पीड महत्त्वाचा. इंटरनेट स्पीड किती एमबीपीएस.. हा सर्वात महत्वाचा प्रश्न आमचा .. पूर्वी साग्रसंगीत जेवण बनवाणारीला सुगरण म्हणत .. पुरणावरणाचा स्वयंपाक करणारी .. पण आजच्या टाइम्समध्ये माझ्यासारखीला सुगरणीचा दर्जा मिळू नये? एकदा माझी मॅगी खाल तर बोटे चाखत रहाल .. गॅरंटी माझी. मागे कुणी एक कविता ऐकवलेली..

तूर डाळी विना बने त्याले वरण म्हनू नही

बनवे दोन मिन्टात मॅगी तिले सुगरण म्हनू नही..

आधुनिक बहिणाबाई जणू..

पण मी ठरवले.. इग्नोअर इट. कां की ते कसली कविता करतात ते त्यांचे त्यांनाच कळत नाही .. फरगेट नि फरगिव्ह .. पेक्षा इग्नोअर.. दॅट्स द नेक्स्ट जेन फिलॉसॉफी .. म्हणून दॅट्स बेटर!

तर सांगत माझ्या सुगरणपणाबद्दल होते.. सांगायचे काय त्यात? मी सुगरण आहे हे एकदा गृहितक मांडले की पुढे सगळे सोपे ..

तर त्यादिवशी रोहन आलेला घरी. वय वर्ष १२. पुण्याहून. म्हणाला,

"मीनू मावशी .. यू कुक सो वेल .. फँटॅस्टिक मॅगी.."

"थ्यांक्स.."

"पण काय उपयोग?"

"म्हणजे? खातोस ना.. उदरभरण होते ना?"

"तो शेवटचा शब्द नाही कळला.. पण जोवर तू ऑनलाईन नाहीस तोवर तू नाहीसच.."

"म्हणजे?"

डायरेक्ट ये जीना भी क्या जीना है लल्लू?

"अगं जे बनवशील त्याला पहिल्यांदा फेसबुक वर टाक.. लोकांच्या लाइक्स आल्या की ग्रेट.. नाहीतर काय अर्थ आहे तुझ्या कुकिंगला?"

नैवेद्य दाखवावा देवाला आई सांगायची.. तसे हे..

"कुकिंगला अर्थ नाही म्हणतोस..?"

"माझं ऐक मावशी तू.. बी अ युट्यूबर.. तू ना यू ट्यूब चॅनलच सुरू कर.."

"यू ट्यूब चॅनेल?"

"यस्स.. तुझे रेसिपी बनवतानाचे व्हिडिओ टाकू.. मस्त .. यू विल रॉक ऑन द नेट! तेव्हा कुठे तुझ्या बिइंगला अर्थ येईल."

वय वर्ष बारा.. बिइंगला अर्थ! रोहन त्याच्या पुणेरी बापावर गेलाय .. पण मी विचारात पडले. पूर्वी मोठमोठे लोक जीवनाचा अर्थ शोधत मोठे व्हायचे..

तप काय.. बोधिवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती काय.. आताच्या जमान्यात जस्ट ट्वेल्व्ह इयर्स ओल्ड रोहनला जीवनाचा अर्थ म्हणून काही असतो नि तो कुठे सापडतो हे ठाऊक आहे! म्हटले ना आजकाल लाइफ इज इन फास्ट लेन..!

"पण मला ते यूट्यूबर बनणे कसे जमणार? मला नाही काही माहिती .."

"ते एकदम सोपे आहे मीनूमावशी.. जस्ट गुगल इट.. गुगल नोज एव्हरीथिंग.. नाहीतर मी आहे ना.. तू फक्त डिसाइड कर.. माझ्या चॅनेलला तर वनफिफ्टी सबस्क्रायबर्स आहेत.."

"तुझा चॅनल?"

"ऑफकोर्स.. रोहन्स रॉकिंग गेम्स! मी त्यात ऑनलाइन गेम्सचे व्हिडिओ अपलोड करतो.. अँड आय ॲम रॉकिंग.."

मी ठरवले.. रॉक द नेट.. बी अ यु ट्यूबर.. नव्या जेनचा गायडन्स महत्त्वाचा ..

"ओके रोहन.. आपण एक ट्रायल व्हिडिओ बनवू .. मी कुकते .. सॉरी कुकिंग करते .."

"अँड आय विल शूट.."

दोन बोटांनी बंदुकीची ॲक्शन करत रोहन म्हणाला.

"पण रेसिपी कुठली टाकशील मीनू मावशी?"

"लेट मी थिंक.. पोहे बनवू? किंवा उपमा? इन्स्टंट?"

"छे! डाऊनमार्केट.. अँड सो मच ना ॅन जंक .."

"मग? पास्ता.. बर्गर .. पिझ्झा .."

"स्टा ॅप.. उगाच माझी भूक स्टिम्युलेट करू नकोस .. बनवणार असशील तर नावं घे सगळी .. नुसता विचार करून तोंडाला पाणी सुटते मावशी .. तू एक काम कर.. मेक मॅगी विथ अ डिफरन्स .."

"म्हणजे?"

"कुछ हटके .. विथ अ तडका .."

"ग्रेट! तडका! मॅगी विथ अ तडका! फोडणी घालते इन्स्टंट नूडल्स मध्ये.."

"वॉव! व्हॉट ॲन आयडिया! कधी करूया शूट? मावशी, मी फक्त रेसिपी दाखवतो.. म्हणजे तुला डेक्ड अप व्हायची गरज नाही.."

आम्ही ट्रायल व्हिडिओ बनवायला घेतला नि रोहनची ही ओपनिंग कमेंट!

"मी शूट करेन तर तू फक्त कॉमेंट्री दे.. मी रेकॉर्ड करतो.."

"ओके.. सर रोहन.."

मी सुरू केले..

"एक जाड बुडाचे भांडे घ्या.."

"व्हॉटस् धिस जाड बुड? कीप इट सिंपल मावशी.."

"एक कोणतेही भांडे घ्या.. वाटी ग्लास चमचा नको.."

"दॅट्स ग्रेट टच मावशी .."

"तू बोलतोस ते रेकॉर्ड होईल ना रोहन?"

"नो वरीज .. वुई विल एडिट.. आपण पाठून म्युझिक इफेक्ट पण देऊ. गो अहेड.."

"एक भांडे घेऊन गॅसवर ठेवा.. आणि गॅस पेटवायला विसरू नका.."

"मावशी .. ग्रेट .."

"गॅस पेटवल्यावर भांडे गरम होईल. त्यात दोन पळया तेल टाका.."

"पळया? कीप इट सिंपल .."

"त्यात दोन चमचे तेल टाका.. तेल गरम झाले की त्यात अर्धा चमचा राई आणि राई तडतडली की.."

"व्हॉट्स तडतडली? कीप इट सिंपल मावशी.."

"राई स्प्लॅटर झाली की त्यात थोडे जिरे टाका.."

"जिरे? एनीवे .. आपण सबटायटल्स टाकू .."

"थोडे हिंग.. कढीपत्त्याची पाच पाने.. हळूहळू चमच्याने फिरवा .."

"वन सेक मावशी .. थोडा हेल्दी टच दे.. से करी लिव्हस आर रीच इन विटामीन सी.."

"कढीपत्ता सी व्हिटामिनने भरपूर असतो.. रोहन नक्की ना?"

"नक्की कशाला हवे? सी नाहीतर डी असेल? हाऊ डझ दॅट मॅटर?"

"अरे पण काहीही सांगून कसे चालेल?"

"अगं मावशी, इंटरनेटवर सगळे अलाऊड आहे. ती काय स्कूलची एक्झाम आहे? पण असे काही बोललीस की हेल्दीनेस कोशंट वाढतो रेसिपीचा.."

"ओके.. तर चार पाच कढीपत्त्याची पाने टाका.. कढिपत्त्यात सी आणि डी जीवनसत्त्वे भरपूर असतात .. त्यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती.."

"एक मिनिट .. कट.. व्हॉट्स दॅट? कीप इट सिंपल .. से इम्युनिटी .."

"ओके.. सो कम्युनिटी विल अंडरस्टँड.. तर कढिपत्त्यामुळे आपली इम्युनिटी वाढते. आपल्या आजी पणजीच्या काळापासून आपण फोडणीत तो वापरतोय.. आपल्या पूर्वजांना त्याची माहिती होती.."

"पूर्वज? व्हॉट एव्हर.. बट साऊंड्स ग्रेट.. गो अहेड.."

"तर मी इथे आता एक छोटा कांदा, थोडा कोबी, एक छोटी ढोबळी मिरची बारीक चिरून घेतली आहे.."

"कट.. कट.. एवढे इनग्रेडियंट्स?"

"तू गप रे.. कीप इट सिंपल ठीक आहे.. पण काही बेसिक गोष्टी तर टाकाव्या लागतील की नाही?"

"ओके.. काँप्रो.. ती मिरची आणि कोबी आऊट.. टू हेल्दी.. पुट सम गाजर आणि मटर .. व्हॉट अ कलर काँबिनेशन..ऑसम!"

"फोडणी झाली की त्यात कांदा, गाजराचे बारीक तुकडे परतून घ्यावेत.. कांदा जळू देऊ नका.. थोडावेळ परतल्यावर त्यात हा मॅगीचा पॅक उघडून घालायचा आहे .."

"से समथिंग पर्सनल अबाऊट मॅगी मावशी .. त्याची इमोशनल व्हॅल्यू वाढव.."

"मॅगी म्हटले ना की मला दोन गोष्टी आठवतात.. परीक्षेच्या दिवसांत रात्री जागून अभ्यास करताना भूक लागली की मॅगी..

आणि ट्रेकवर.. अमिडस्ट द नेचर.. लाकडाच्या काठ्या पेटवून शिजवलेली मॅगी.. वॉव! आजही तोंडाला पाणी सुटते.."

"फँटॅस्टिक मावशी.. ग्रेट.."

"तर हा व्हेज आटा नूडल्सचा पॅक आहे.. आधी मी नूडल्सचा हा स्लॅब चार तुकड्यात विभागून घेणार आहे .."

"कीप इट सिंपल मावशी .."

"चार तुकड्यात डिव्हाइड करून घेणार आहे.. ते मग या कांदा.. गाजरच्च्यावर टाकून वरून पाणी टाकायचे आहे.. साधारण सर्व मॅगी पाण्यात बुडून.."

"ड्राऊन?"

"पाण्यात बुडेपर्यंत पाणी घालायचे आहे.. त्यावर हा मसाला उघडून टाकायचा आहे.. अहाहा .. काय सुगंध आहे मसाल्याचा .. आणि यात हे गाजराचे तुकडे नि मटारचे दाणे ही आहेत.. त्यामुळे हे एकदम हेल्दी खाणे होणार आहे.. पाण्याला उकळी फुटते आहे.. मसाला त्यात जिरतो आहे.."

"फॉर गॉड्स सेक.. से सोक .. कीप इट सिंपल .."

"तर मसाला त्यात सोक होत आहे. दोन ते तीन मिनिटे हा शिजू द्यायचा आहे.. काय मस्त सुगंध सुटलाय सांगू.."

"ग्रेट मावशी .."

"मॅगी बनवण्याचा एक फायदा असा ना की यात वरून मीठ घालावे लागत नाही. मोस्ट ऑफ द अमॅच्युअर्स फाइंड इट डिफिकल्ट .. किती मीठ टाकू? सॉल्ट टू टेस्ट म्हणजे किती? हे शिजतेय तोवर माझ्या रूममेटची गोष्ट सांगते.. तिने मोठया ऐटीत बटाट्याची भाजी बनवायला घेतली.. सगळे काही चार चमचे.. हळद तिखट मोहरी जिरे .. आणि मीठ .. तिच्या भाजीच्या चवीतून ती कित्येक दिवस सावरली नव्हती .."

"ग्रेट मावशी.. नाइस टच टू व्हिडिओ .."

"आता मॅगी शिजत आलीय.. सी द कलर कॉंबिनेशन.. परफेक्ट फॉर फोटोग्राफ ऑन एफ.बी. आणि मी आता हे बाऊल मध्ये सर्व्ह करणार आहे.. हं.. किती मस्त सुवास सुटलाय..

तुम्हाला पाककृती आवडली.."

"सिंपल मावशी .. रेसिपी.."

"तुम्हाला रेसिपी आवडली तर जरूर करून पहा. तुम्हाला व्हिडिओ आवडला तर लाइक ठोका.. आणि माझा चॅनेल सबस्क्राइब करा.. म्हणजे पुन्हा मी घेऊन येईन एक नवी रेसिपी त्याचे नोटिफिकेशन तुम्हाला येईल. आणि काही कमेंट्स असतील तर खाली कमेंट बॉक्समध्ये लिहून कळवा.."

"वॉव. रॉकिंग मावशी! ग्रेट .. ऑसम! पण गिव्ह पर्सनल टच नाऊ.. सांग माझ्या घरी सर्वांना .. नको, सांग जीजूंना आवडणारी डिश आहे ही.. आणि ही डिश फक्त माझ्या हातची खातो तो.."

"कोण? कोण जीजू?"

"कोण जीजू काय? तुझा बॉयफ्रेंड मावशी .. लग्न झाल्यावर माझ्या आईचा जीजू.."

"रोहन .. चुप. आगाऊच आहेस .."

"आगाऊ काय? से स्मार्ट मीनू मावशी.. तुला व्ह्यूज आणि लाइक्स हवेत तर असे टच जोडावे लागतात.."

"कोपरापासून नमस्कार आहे तुला.."

"आणि व्हिडिओला नाव काय देऊया माहितीय? अशी बनवा फोडणीची मॅगी की नेहमी अशीच बनवाल.. किंवा चमचे चाटून खात रहाल.."

"वॉव.. आता तू आहेस तोवर खराखुरा व्हिडिओ बनवूया आणि टाकूया यू ट्यूबवर.."

"वन सेक.. दाखव तुझ्या नेटचा स्पीड किती आहे?ट्वेंटी एमबीपीएस .. ग्रेट .. म्हणजे सेव्हन टू टेन मिन मध्ये अपलोड होईल.."

तर मंडळी लवकरच येतोय माझा यू ट्यूब चॅनेल .. 'मीनाक्षीज सुपर फास्ट किचन' .. बघा, लाइक आणि सबस्क्राइब करा.. खालचे बेल आयकॉन दाबा आणि कीप इन टच.. बाय देन. इट जंक इन अ हेल्दी वे आणि टेक केअर.. सी यू..

# मी आणि माझं स्टेटस्!

ऑडिओ व्हिडिओ –

मी आणि माझे स्टेटस ! भाग - १

मी आणि माझे स्टेटस ! भाग - २

'काळ बदलतो.. तो प्रवाही आहे. कुणासाठी थांबत नाही. वेळ जायला वेळ लागत नाही ..'

ही विचारमौक्तिके मी गोळा केलेलीत ती गुरूजी श्री श्री शंकरबाप्पांच्या प्रवचन कम निरूपण कम कीर्तनातून. श्री श्री शंकरबाप्पा म्हणजे साक्षात अवतारी पुरूष. पण सांगायचे त्यांच्या बद्दल नाही. सांगायचेय ते बदलत्या काळाबद्दल. मागे त्याला बदलता मनू वगैरे म्हणत म्हणे. आता तो मनू असेल की मन्या.. तो बदलला हे खरे. बदल हाच स्थायी भाव म्हणे.. हे विधान वाचून मीच अस्थायी झाले .. भारावून गेले.. आणि आजच्या युगात जळी स्थळी काष्ठी पाषाणी व्यापून दशांगुळे उरलेल्या माझ्या मोबाईलवर स्टेटस लिहिती झाले..

'थरली इम्प्रेस्ड! फिलींग ग्रेट!'

तुम्हाला सांगते पुढच्या पंधरा मिनिटात पंधराशे लाइक्स आले स्टेटसला .. एका नी तर लिहिले 'इम्प्रेस्ड थरली विथ युवर स्टेटस्!' बाकी 'ग्रेट' आणि 'ऑसम' फिलिंग कन्व्हे करणारे ही आले मेसेजेस. थोडक्यात काय हे स्टेटस् आता स्टेटस् सिंबॉल झालंय! तोच बदलत्या काळाचा महिमा!

म्हणजे आमच्या पूर्वीच्या जमान्यात लोक स्टेटस सुधारायचे म्हणून मेहनत करत.. आपले स्टेटस् सांभाळायची चिंताही करत. सोसायटीत आपल्या स्टेटस् प्रमाणे राहायचा प्रयत्न करत. आणि एकदा कमावले स्टेटस् की ते वर्षानुवर्षे बदलत नसे. पूर्वीचे सिनेमे पहा. घराने की इज्जत वगैरे डायलॉग म्हणजे तेव्हाचे 'स्टेटस् सिंबॉल' होते. लोकं स्टेटस् सांभाळायला गाडीबिडी घ्यायचे. स्टेटस् प्रमाणे राहायचे तर घर तसेच हवे .. आधी घर की आधी स्टेटस् हा प्रश्न मात्र आधी कोंबडी की आधी अंडे किंवा आधी विरजण की आधी दही याप्रमाणेच अनुत्तरित होता. पण स्टेटस् महत्त्वाचे होते. अगदी पिढ्यान पिढ्या हे स्टेटस् पुढे चालत राहावे म्हणून तेव्हा सारेच झटत. रोटी कपडा और मकान इतकीच स्टेटस् ची चिंता करत लोक.

आता जमाना बदलला. रोटी कपडा मकान आणि इंटरनेट या माणसाच्या मूलभूत गरजा झाल्या. स्टेटस् त्याप्रमाणे बदलले. तेव्हाचे स्थायी स्टेटस् आता अस्थायी झाले.. म्हणजे बघा ना.. माझे ते फिलिंग ग्रेट स्टेटस् पुढील चार तासात बदलले मी.. म्हणजे झाले काय ना शाळेतून फोन आला.. दुसरीतला मुलगा माझा. त्याला म्हणे ॲपलचे स्पेलिंग येत नाही .. कसे होणार त्याचे या चिंतेने मला घेरून टाकले .. चार तासांत माझे स्टेटस् बदलले.. 'फिलिंग लो!'

या फिलिंग लो बद्दल सहानुभूतीचे फिलिंग्स दाखवणारे मेसेजेस आले मला .. 'टेक्केअर' पासून 'डोंवरी..' पर्यंत. काही नुसतेच इमोजी आले.. आणि काही उपदेशाचे डोस पाजणारेही आले. म्हणजे 'जीवन कसे क्षणभंगुर आहे' यापासून 'जीवन अनंत आहे..' 'त्या भवसागरातील आपण क्षुद्र कीडा आहोत' पासून 'यू आर द मोस्ट इंपॉर्टंट पर्सन इन युनिव्हर्स' पर्यंत .. असे सगळे मेसेजेस आले. सारे वाचताना पुढचे चार पाच तास सहज निघून गेले. ॲपलचे स्पेलिंग मुलाला उद्या तरी शिकवायचेच असा निर्धार करून मी बाकी मेसेजेस कडे वळले.. तर लक्षात आले सगळ्यांना थ्यांक्यू म्हणायचे तर राहूनच गेले. परत मोबाईल हाती घेतला .. पुढील एक तास धन्यवादात गेला.. बिचारा मुलगा शाळेतून येऊन दप्तर फेकून खेळूनही आला तोवर हे धन्यवादाचे प्रकरण सुरूच

होते.. कारण काही धन्य लोकांनी तर माझ्या थ्यांक्स बद्दल थ्यांक्स असले मेसेज पाठवले. काहींनी नमस्कार तर काहींनी नुसताच थम्स अप! शेवटी उठले मी तर नवीन स्टेटस् टाकून .. 'जीवनातल्या कठीण प्रसंगी मदतीस धावून येतो तोच खरा मित्र ..' आणि यावर काही कमेंट येण्यापूर्वी स्वयंपाकाला लागले मी. शेवटी काम महत्त्वाचे .. हो की नाही?

पण जाता जाता कालची गंमत सांगते.

म्हणजे काय आहे काल मी खूप दिवसांनी पावभाजी बनवायला घेतली. माझ्या मैत्रिणीने काल पिझ्झा बनवून टाकलेला. म्हणून मग मला पावभाजी टाकावीच लागणार होती. स्टेटस् मध्ये टाकले, 'मेकिंग पावभाजी टुडे!' त्यावर ही मेसेजेसची लाइन. म्हणजे कोणी तोंडाला पाणी सुटले म्हणे.. कोणी मस्त म्हणाले .. कोणी न खाताच टेस्टी म्हणाले तर कुणी यमाच्या मम्मीची साक्ष काढत यम्मी म्हणाले. सगळे मेसेजेस वाचता वाचता खरंतर पावभाजी बनवायचा कंटाळा आलेला.. पण आता बनवलेल्या पावभाजीचा स्टेटस टाकण्यासाठी तरी ती बनवायला पाहिजेच. मागच्यावेळी बनवलेली पावभाजी, पण तिचा फोटो सेव्ह नाही केलेला, नाहीतर तोच परत टाकता आला असता! आणि ती स्टेटस्

पूर्वकालीन पावभाजी. यावेळी नक्की सांभाळून ठेवीन. मग पावभाजीच्या तयारीला लागले. पावभाजी बनवणे म्हणजे किती भानगडी. सगळ्या पार पाडल्या. भाजी एका काचेच्या मस्त भांड्यात काढली नि टाकला फोटो! काय सांगू? चवदाशे सत्त्याहत्तर कमेंट्स! जेवायला वेळ होता तोवर सगळ्यांना रिप्लाय केले. जेवायला बसलो तर ह्यांची पहिलीच कमेंट.. 'मीठ नाही भाजीत!'

नसेल ही. सगळे फोटो काढण्याच्या नादात राहिलेही असेल. मीठाचे काय एवढे? ते फोटोत थोडीच दिसते? सगळ्यांनी त्या भाजीला यमी म्हटलेले ते काय उगीच. त्यापुढे नवऱ्याच्या एका मताची ती काय किंमत? मी म्हटले ही..

"उगाच काही सांगू नका.. पंधराशे लाइक्स आहेत भाजीसाठी!"

शेवटी बहुमताचा विजय व्हायलाच पाहिजे की नाही?

मला आठवतेय काही वर्षांपूर्वीचे रटाळ नि नीरस आयुष्य. आपल्या मनातल्या भावना शेअर करण्यासारखी आनंदाची गोष्ट नाही.. हे त्या शेअर केल्यावरच ध्यानात येऊ लागले माझ्या. मी सांगू पहिलाच स्टेटस् टाकला कुठला ते? माथेरानला गेले होते तिकडचा! नुसताच फोटो. मग कुणी त्याला हिमाचलचा फोटो

म्हणाले तर कुणी उत्तराखंडचा.. ग्रेट फोटो बद्दल सर्वांचे एकमत होते. एकात आमचा दोघांचा फोटो होता. गंमत सांगू? घोड्यावर बसण्यासाठी भाव करण्यावरून आमची वादावादी झालेली. ह्यांना सगळ्याच गोष्टीत बारगेन करायचे असते. मी म्हटले आपण रोज का येतो माथेरानला? उगाच भाव कशाला करताय? मग कसाबसा तो वाद मिटला. नि मी तो फोटो टाकला स्टेटस् मध्ये .. त्यावर 'लुकिंग हॅपी टुगेदर'ची कमेंट आलीच! आता इतके सगळे म्हणतात तर आम्ही हॅपी असलोच पाहिजे नाही का? हा विचार करून मी हसलेच तेव्हा.

मग हळूहळू स्टेटस् प्रकरण अंगवळणी पडले माझ्या. घरातून बाहेर पडले की स्टेटस् .. घरात परत शिरले की नवे स्टेटस्. नवीन काही बनवले की त्याचा फोटो.. नाही बनवले की मूड नसल्याचे स्टेटस. बदलत्या मूडप्रमाणे बदलणारे स्टेटस आणि त्याच्यावर कमेंट नाही आल्या तर मूड गेला त्याचा अजून एक स्टेटस्. मुलगा पहिलीत गेला तेव्हा त्याच्या फोटोवर भावी शास्त्रज्ञ, डॉक्टर, इंजिनियर, आर्किटेक्ट अशा कमेंटस्.. खेळतानाचा फोटो टाकला की लगेच भावी सचिन .. नाहीतर भावी कोहली.. असल्या कमेंटस्. तुम्हाला सांगते, या लाइक्स नि कमेंट्सनी अगदी भरून येतं मन.

मग 'फिलिंग इमोशनल विथ युवर कमेंट्स'चे स्टेटस् टाकले की स्टेटस् कसे अपडेट झाल्यासारखे वाटते एकदम.

स्वत:चेच सोडा, इतरांचे स्टेटस् बघण्यासारखा दुसरा आनंद नाही. पूर्वी चाळीत लोक राहायचे तेव्हा नाही एकमेकांच्या घरात डोकावायचे थेट.. बंद दाराआडची संस्कृती अलीकडची. पण स्टेटस् ने सारे चित्र बदलले. कोण किती सुखसागरात डुंबत आहे की दु:खात बुचकळून काढल्यासारखा बावचळून बसला आहे.. कोण अगदी टा ॅप ऑफ द वर्ल्ड फिल करतोय तर कोण डाऊन इन डम्पस आहे.. कोण एक्सायटेड तर कोण थ्रिल्ड.. इतकेच नाही अगदी दैनंदिन स्टेटस् अपडेट होतात .. गॉटप जस्ट नाऊ पासून गोइंग टू बाथरूम.. नि स्लिपिंग नाऊ पर्यंत. सारे काही लाइक ओपन बुक! हे ओपन बुकचे स्टेटस् कालच वाचलेले आठवले मला.

स्टेटस मध्ये सारे काही दिसते.. कोण आता प्रवासाला निघतोय.. कोण पोहोचलाय ट्रेन मध्ये नाहीतर विमानतळावर .. कोण आता उडायच्या बेतात आहे.. कोण शुद्ध देशी ठिकाणी चाललाय सुटीत तर कोण परदेशी म्हणून गेलाबाजार बांगलादेशात चाललाय पर्यटनाला .. कोणाच्या कितव्या वाढदिवसाचा केक कापला जातोय नि कुणाच्या लग्नाची ॲनिव्हर्सरी साजरी होतेय..

कुणाच्या घरी आता सत्यनारायण आहे.. कुणाच्या घरी वास्तुशांत .. वगैरे सारे काही. सारे काही जगजाहीर. अगदी जुन्या जमान्यातल्या चाळींसारखे!

सणवारीत तर या स्टेटसना वेगळेच स्टेटस् मिळते. स्टेटस् वर गणपतीच्या दिवसांत गणपतीचे फोटो नसतील तर बाप्पाचा डायरेक्ट कोप होतो म्हणे. खरे खोटे ठाऊक नाही पण मी वाचलेय कुठेतरी. उगाच कशाला रिस्क. मी तर दहाही दिवस वेगवेगळ्या गणपतींचे फोटो टाकते. नवरात्री दसरा दिवाळी म्हणजे तर स्वत:चेच स्टेटस् असलेले सण. त्यात मग पणती.. कंदील .. रांगोळ्या .. चकल्या नि चिवडा.. वगैरे आलेच. त्यात कुणी मेकिंग चकली टुडे म्हणतेय तर कुणी बेसन लाडू टुडे म्हणून स्टेटस् टाकते. एकीने तर पाडव्याच्या दिवसांत मेकिंग श्रीखंड म्हणून चक्क्यासाठी उलट्या टांगलेल्या दह्याचा फोटो टाकलेला. कुणाला ते काय आहे ते न कळून त्यावर नाइस कपडा .. गुड टेक्स्चर अशी कमेंट आलेली म्हणे! लोकं किती विचित्र असतात नाही? कमीत कमी हाऊ टू मेक चक्का फॉर श्रीखंडचा गुगल सर्च तरी करायचा आधी. रांगोळ्या नि कंदील तर इन्स्टंट हिट. माझी एक बॅकवर्ड मैत्रीण आहे. बॅकवर्ड म्हणजे कधीच या स्टेटस् अपडेट मध्ये नसणारी. ती रांगोळी

आर्टिस्ट. तिच्या रांगोळीचा फोटो तिने पाठवला नि मी लगेच 'रांगोळी टुडे' म्हणून माझ्या स्टेटस् मध्ये टाकला. तुम्हाला सांगते.. कमेंटसचे फटाके वाजले सगळीकडे.. पण सगळ्यात मोठी कमेंट एका बालमैत्रीणीची आली.. नववीत ड्रा ॅईंग मध्ये फेल झालेली तूच यावर विश्वास बसत नाही म्हणाली! सांगायचा मुद्दा लोकं काय काय किती वर्ष लक्षात ठेवतात नाही?

असो. तर स्टेटस म्हणजे एकमेकांच्या मनात डायरेक्ट डोकावण्यासाठी बनवलेली चावडीच आहे म्हणा ना. जुन्या चाळीतल्या खोलीसारखेच झाले की हे. कुणीतरी मागे म्हणालेले.. 'गोष्टी जितक्या बदलतात तितक्याच त्या पूर्वीसारख्या राहतात' .. वा! काय वाक्य आहे.. एकदम ऑसम.. तुम्ही मी काय म्हणतेय त्यावर विचार करा..

.. तोवर हे वाक्य माझ्या स्टेटस् वर टाकून आलेच मी..

# माझा आवडता नवरा

ऑडिओ व्हिडिओ –

माझा आवडता नवरा

(शाळेत असताना कसले कसले निबंध लिहायची सवय असते.. माझा आवडता पक्षी किंवा प्राणी.. माझे आवडते फूल वगैरे. त्या शाळकरी वयातील निबंध म्हणजे बहुतेक एका साच्यातून काढलेले उतारे.. फक्त पोरं थोड्या ऱ्हस्व दीर्घाच्या चुका करतील इतकेच फरक.. नाहीतर अहाहा! किती मधुर तो सुगंध.. असली सुरूवात माझे आवडते फूल या निबंधाची असायलाच हवी.. पक्षी असेल तर आकाशी झेप घे रे पाखरा .. वगैरे नववी दहावीच्या निबंधांचा अविभाज्य भाग जर विषय माझा आवडता पक्षी असेल तर.. एखाद्या पुस्तकाने कसे शहाणपण शिकवले हे माझे आवडते पुस्तक या निबंधात सांगणारी शहाणी मुलेमुली असतातच. पण हल्ली शिक्षणाचा ढाचा बदलला आहे असे ऐकिवात आहे. जीवनाभिमुख शिक्षण आणि जीवनशिक्षण असली काही प्रगती शिक्षणक्षेत्रात होताना दिसते. त्यामुळे माझे आवडते पक्षी, प्राणी वगैरे सजीव किंवा आवडते पुस्तक, ठिकाण वगैरे

निर्जीव विषयांची मर्यादा शिक्षणाने ओलांडली आहे. जीवनाभिमुख शिक्षणाच्या अभ्यासक्रमात स्टार्ट इट अर्ली हे तत्व आहे म्हणतात. त्यामुळे शासनाने 'सारे काही लवकर' असा जी आर मराठीत काढला. शासकीय असल्याने त्याची भाषा समजण्यासाठी काही भाषा तज्ञांची उच्च स्तरीय समिती गठीत करण्यात आली.. समिती कधीच बनवत नाही .. तिचे गठनच करावे लागते.. ह्या अलिखित शासन निर्देशानुसार.. त्या गठन केलेल्या समितीने नियमांना अधीन राहून विविध शब्दकोषांची मदत घेऊन त्या आदेशाला डि कोड केले.. त्यातून ध्यानात आले ते हे.. पुढील आयुष्यात होणाऱ्या गोष्टींसाठी विद्यार्थी विद्यार्थिनींना तयार करा.. त्यासाठी स्टार्ट इट अर्ली .. म्हणजे असे विषय वयाच्या सात आठ वर्षांपासूनच हाताळा ..

निर्देश शासनाचा असल्याने तो पाळणे भागच आहे.. इमाने इतबारे तो पाळला गेला.. त्यानंतर एका चौथीच्या हुशार आणि चुणचुणीत विद्यार्थिनीच्या वहीत सापडलेला हा निबंध.)

## *माझा आवडता नवरा*

प्रत्येक मुलगी ही पुढे जाऊन बाई होते आणि मग तिला नवरा मिळतो असे मी ऐकले आहे. मुलगी मोठी होत गेली की तिची बाई होते की बाई झाली की मोठी होते ठाऊक नाही पण तशी झाली की

तिला एक नवरा मिळतो. मी अजून मोठी झाली नाही म्हणून मला नवरा नाही पण नंतर तो मिळेल. मी आईला विचारली तर आई म्हणाली, मोठी होशील तेव्हा सांगेन. म्हणजे नुसत्या नवऱ्यासाठीच नाही तर आईला ते सांगायला पण मी मोठी व्हावे लागते. तर मी होईन मोठी तेव्हा माझा पण स्वतःचा असा एक नवरा असेल.

माझा जो असेल कोणी नवरा तोच माझा आवडता नवरा असेल. मी आजूबाजूला पाहिली तर दर बाईला एकच नवरा असतो. म्हणजे तोच आवडता असणार नाही का? तर तोच माझा तेव्हा आवडता नवरा असेल. बाकी नवऱ्याबद्दल मला नाही माहिती पण आई म्हणाली ते सांगते. म्हणजे मी आईला विचारली की माझा गं नवरा कसा असेल? तर आई हसायला लागली. मग मी सांग ना सांग ना बोलली तर आईने सांगितले ते आठवेल तसे माझा आवडता नवरा म्हणून निबंदात लिहित आहे. आणि बाकीचे आजूबाजूच्या बायकांचे नवरे पाहून लिहित आहे.

नवरा हा एक माणूस असतो. म्हणजे गायीवरच्या निबंदात तिला चार पाय दोन शिंगे दोन कान वगैरे असतात तसे नवरा या प्राण्याला दोन पाय दोन हात दोन कान आणि डोळे असतात. काही

नवरेलोक डोळ्यांवर चष्मा घालून असतात. त्यांच्या कानांचा उपयोग चष्म्याच्या काड्या अडकवण्यासाठी होतो. म्हणजे काही नवरेलोक अजिबात आइकत नाहीत, असे त्यांच्या बायका म्हणतात. म्हणजे कानांचा उपयोग चष्मा अडकवण्यासाठी झाला की नाही? पण कान नसते तर ऐकू न येण्याबरोबर त्यांना दिसले ही नसते नाही का? त्यामुळे डोळ्यांची काळजी डोळ्यात तेल घालून घेतली पाहिजे असे आई म्हणते. पण नवरेलोक तसे करत नाहीत. म्हणजे आई म्हणते टीव्ही जास्त बघू नको नि मोबाईल घेऊन बसू नको. मी तर मोबाईल बाबाचा घेऊन कधी कधी दररोज दोन तास गेम खेळते तेवढेच. टीव्ही पण मी थोडासा बघते. कार्टून वगैरे. पण नवरेलोक टीव्ही बघतात आणि वेळ मिळाला की मोबाईल घेऊन बसतात. त्यांचे डोळे खराब होतील हे त्यांच्या आईने सांगितले नसेल का? पण आईचे न आइकणारे पण नवरे असतात. असे माझी आई नाही बोलली, तर मीच आजूबाजूला पाहून सांगते.

नवरेलोक सकाळी उठले की पेपर वाचत बसतात. तयार चहा पिता पिता पेपर वाचल्यावाचून चहा पोटात नीट जात नाही म्हणतात. मग आरामात तयारी केली की कामावर जायला उशीर झाल्याचे कळले की हे लोक घाई घाई करतात आणि धावत सुटतात. मग मध्येच डबा घरी विसरतात नाहीतर चावी किंवा पाकिट. त्यासाठी ते मग बायकोला दोष देतात. उगाच धावाधाव

करून एकदा ऑफिसला गेले की मग मात्र बायको सुटकेचा श्वास सोडते. हे आईला करताना पाहिली आहे मी. संध्याकाळी आले की हे लोक पाय पसरून लोळत पडतात. घरातील एकही काडी इकडची तिकडे करायला नको असे आई म्हणते पण छत्रीची काडी मात्र बाबाच दुरूस्त करून आणतात.. माळ्यावरची छत्री उडी मारून काढण्याचे काम पण त्यांचेच.

सुटीच्या दिवशी नवरे लोक परत पाय पसरून झोपतात. सुटी म्हणजे दिवाळी दसरा वाटतो की काय? दिवाळी दसरा हातपाय पसरा म्हणतात म्हणून म्हणाली मी. बायको लोक यावरून ओरडाआरड करताना मी पाहिली आहे. पण त्याचा ढिम्म परिणाम होतो असे आई एकदा बोलली. काही नवरे लोक भांडणपण करतात. उगाच ओरडणारे नवरे लोक मला आवडत नाहीत. पण माझा नवरा तसा नाही. म्हणजे नसणार.

तसा माझा अजून नवरा नाही. पण मोठी झाली की तो येईल. आणि तोच माझा आवडता नवरा असेल. त्याला मी आवडता नवरा म्हणाली कारण तो माझे सर्व आइकेल. मी बोलेन तसा वागेल. म्हणजे मग का नाही तो आवडता बनणार? फक्त मी त्याला घरची कामं शिकवली की तो आणखीन आवडता बनेल. त्यासाठी मी त्याला शाळेत घालेन. तिकडे शिकला की तो पण मोठा होईल.

आईचे पण आइकणारा असा नवरा असला की बरे. असा असेल माझा नवरा..

कळले ना कसा असणार माझा आवडता नवरा? तुम्हाला ही नक्कीच आवडणार तो..

## कांदेपोह्यांच्या गोष्टी!

ऑडिओ व्हिडिओ –

कांदेपोह्यांच्या गोष्टी! भाग - १

कांदेपोह्यांच्या गोष्टी! भाग - २

कांदेपोह्यांच्या गोष्टी! भाग - ३

कांदेपोह्यांच्या गोष्टी! भाग - ४

कांदेपोह्यांच्या गोष्टी! भाग - ५

मी तशी आईवर गेलेय..

म्हणजे चोखंदळपणाच्या बाबतीत.

आई कोथिंबिरीची काडी न काडी नि कढीपत्याचे पान न पान निवडून घेते. भेंड्यांची टोके मोडून त्या भुंड्या केल्याशिवाय ती त्या विकत घेत नाही.

कपड्यांबद्दल तर बोलायलाच नको. साडी दुकानातला सेल्समन समोर शंभर साड्या टाकेल पण ती तुमच्याकडे व्हरायटी नाही म्हणून परत फिरेल.. अगदीच काही आवडले तर तिला एका साडीचा कलर, दुसरीचा पोत, तिसरीचा पदर नि चौथीचा काठ आवडतो. या सगळ्याचे मिश्रण असलेली साडी मिळेल का म्हणून

ती दुकानदाराच्या मागे लागू शकते. या इतक्या चोखंदळपणा नंतरही तिच्याकडे इतक्या साड्या आहेत तर त्या खरेदीत किती वुमन अवर्स गेले असतील याचा विचार करायला हरकत नाही. आजवर फक्त आगपेटीच्या प्रत्येक काडीला विकत घेण्याआधी तिने पेटवून पाहिले नसेल. बाकी सारे तिच्या ISI स्टॅंडर्ड नुसार होत आले आहे.

अशा आईचे गुण माझ्याकडे संक्रमित होणे यात आश्चर्य नाही. माझ्या लग्नाच्या वेळी मी मुलाची परखड परीक्षा करणार हे ठरलेले होते. त्या आधी माझ्यासारखी मीच हे आईने ठसवलेले मनावर. तेव्हा मुलगा अनुरूप म्हणजे.. त्या स्टॅंडर्डचा हवा.. की नाही छावा?

'परिकथेतील राजकुमारा' हे माझे आवडते गाणे. स्वप्नातून सत्यात कधी येईल राजबिंडा रूबाबदार आपल्या त्या अबलख वारू वरून ? पूर्वी बरे होते.. स्वयंवर मांडले की की यायचे ते.. तेवढाच चॉइस मिळायचा! आता 'स्वयंवर' नि 'जीवनसाथी' असल्या नावाची वधूवरसूचक मंडळे असली कामे करतात. फक्त अबलख वारू मात्र आऊटडेटेड झालेत!

मी एकुलती. माझ्याबाबतीत आई म्हणायची.. 'गुणाची पोर ती.. अशा तशाच्या गळयात नाही बांधायची..' आणि मग बाबांकडे बघत एकदा म्हणाली होती, 'नाहीतर.. आमच्यावेळी.. आम्हाला नाही दिला आईबापानी चॉइस..'

तर दोन गोष्टी..

एक.. मी लग्नाळू झालेली

आणि

दुसरे.. मुलगा मी चोखंदळपणेच निवडणार!

थोडक्यात..

'यंदा कर्तव्य'चा अदृष्य बोर्ड लागला नि आमच्या घराजवळील दुकानातले कांदे, पोहे नि त्यासाठी संलग्न सामग्रीचा खप वाढला.

मला आठवतोय ..

मी पाहिलेला पहिला मुलगा.. सहा फुटी धिप्पाड होता. मी असली लहान चणीची नि नाजूकसाजूक.. माझ्याहून दुप्पट असेल तो. खरे नाव त्याचे आठवत नाही पण मी त्याला स्वत:च नाव

ठेवले.. बजरंगी! त्या कुठल्याशा गोष्टीसारखा गाडीभर जेवत असावा! त्याच्यापुढे त्या बशीतले पोहे केविलवाणे वाटत होते.

त्याला उकडलेली एखाद डझन अंडी नि चरवीभर दूध द्यायला हवे होते खरे. पण कार्यक्रम पडला मुलगी बघण्याचा ! त्यात फक्त कांदेपोहेच अलाऊड असतात म्हणे! कुणी उपमा देऊन किंवा इडली डोश्याबरोबर मुलगी पाहिल्याचे ऐकलेय का? त्यामुळे ते पोहे.. म्हणजे कांदेपोहेच  त्याला द्यावे लागले. मुलगा बाकी कसा कोणास ठाऊक. पण माझ्या दुप्पट तरी होताच.. लांबी, रूंदी,  उंची आणि आकारमानात..त्याने मला काही जुजबी प्रश्न विचारले. तशी मी तोंडी परीक्षेला तोंड चांगले देते.. त्यामुळे काही बिघडले नाही. आई मग म्हणाली.. 'कुमे .. तुला काय विचारचेय ते विचार..'

आता हे सांगायलाच पाहिजे.. माझे खरे नाव कुमे.. म्हणजे कुमुद किंवा कुमुदिनी आहे असे वाटेल .. पण ते तसे नाही.. मी लोचन .. त्यातून कुमे किंवा कुमी नाव पडले ते कसे .. ती गोष्ट सांगत बसत नाही मी.. नाहीतर ती मी पाहिलेली मुले मागे पडायची.. असेही लोचनचे नाव हाक मारण्यासाठी लोच्या.. लोची .. नाहीतर चन्या ..चनी असे काही होण्यापेक्षा हे कुमे बरे.. तर तो पैलवान.. मी म्हणाले आईला .. 'माझा विश्वास प्रश्नोत्तरांवर नाही.' हे ..म्हणजे .. बजरंगी.. नशीब तेव्हा बजरंगी भाईजान नाही

म्हणाले.. अर्थात तसे म्हटले असते तरी चालले असते असे नंतर वाटले.. तर मी म्हणाले.. 'या बजरंगीने आपली ताकद दाखवून द्यावी..' खरे तर म्हणायचे होते.. उठ बे पैलवान.. चढा ओ सामान .. उपर रख .. पण म्हणाले.. 'आई किती ताकदवान आहेत हे.. शक्तिमान.. पाहूयात कसे उचलतात ते सामान..'

मग त्याला आतल्या खोलीत नेले.. वरचा पोटमाळा साफ करायला काढलेला. मोठमोठ्या जड पेट्या खाली काढलेल्या. मी म्हणाले.. 'हीच वरपरीक्षा.. ठेवून दाखवा या मोठमोठ्या पेट्या वरती..' तो बजरंगी शड्डू ठोकून उभा राहिला. 'हा माझ्या डाव्या हाताचा मळ..' म्हणत एक एक पेटी वर चढवली त्याने. डाव्या हातचा मळ म्हणत त्या जुन्या पुराण्या ट्रंका चढवता चढवता त्याचा शर्ट मात्र चांगलाच मळला! 'किती माझी कुमी हुशार' म्हणत आईने माझे कौतुक केले.. अर्थात तो बजरंगी गेल्यावर. माझ्या स्वप्नातला राजकुमार अगदी नाजूक नसला तरी इतका आडदांड ही नव्हता. तेव्हा त्या पेट्या वर चढवून घेण्याहून अधिक काही नाही झाले. बजरंगी कडूनही काही निरोप नाही आला. कदाचित त्या कपड्यांचा ड्रायक्लिनिंगचा खर्च.. त्यामुळे रागावला असावा. काही असो.. ही पहिली कथा काही पुढे गेली नाही. काही बिघडले नाही.. पहिला घास देवाचा असे संस्कारच आहेत ना आईचे.

मधे काही दिवस असेच गेले..

परत एकदा कांदेपोह्यांची ऑर्डर आली! तोवर मी स्मार्ट झालेली. कांदा चिरायला एक यंत्रच आणून ठेवलेले मी. किती दिवस हे कांदे सोलावे .. म्हणजे चिरावे लागतील कोणास ठाऊक! चोखंदळपणे मुलगा निवडायचा तर वेळ लागणारच!

आईतर म्हणाली बाबांना .. 'हे कांदेपोहे प्रकरण लांबू शकते.. एक पोते कांदे टाका आणून! आणि नीट एक एक निवडून आणा.'

बाबा गमती.. म्हणाले, 'कांदा कांदा जपून आणीन गुलाबाच्या फुलापरी ..'

तर या वेळी तो मुलगा त्या धिप्पाडाच्या एक चतुर्थांश निघाला! म्हणजे गणित केल्यास माझ्याहून निम्मा! पाप्याचे पितर. कोणी इतका हाडाच्या सापळ्यासारखा कसा राहू शकतो? काही खात असावा की नाही?

त्याने विचारले.. 'पुढे काय करणार?'

मी सांगून टाकले.. 'विशेष काही नाही.. लग्न!'

खरे बोलणे ही माझी खासियत.. हे त्याला त्यातून कळले असेलच! उगाच ताकाला जा आणि भांडे लपवा कशाला? हो की नाही? मी मग विचारले.. 'किती किलोचे पोते उचलू शकता?'

तो गोंधळला. म्हणाला, 'तुमचे काय धान्याचे दुकान आहे की काय? किंवा रेशन दुकान?'

मी म्हटले, 'नाही हो .. असेच शारीरिक क्षमतेचा अंदाज यावा म्हणून!'

त्यावर तो काडीपैलवान हसला ..हसायचा तो तोंड वाकडे करून .. मला माकडासारखा वाटला. पाठच्या आरशात त्याला शेपूट आहे का ते मी पाहणार होते.. पण हा बसलेला. दिसणार कसे? तर हा माझ्या त्या प्रश्नावर म्हणाला, 'मला असला विनोदी स्वभाव आवडतो!'

मी इतक्या गंभीरपणे विचारतेय नि ह्याला तो विनोद वाटतोय? मग नेहमीप्रमाणे कांदेपोहे आले.. आधी त्या पैलवानासमोर ती बशी केविलवाणी वाटायची नि आता त्या बशीसमोर हा सिंगल फसली केविलवाणा वाटत होता! एकूण हा बघण्याचा कार्यक्रम संपला.. पहिला आधीच देवाला दिलेला.. म्हटले हा पण देऊन टाकू! नरबळी! वा वानरबळी?

आई म्हणाली शेवटी.. 'कुमे बरे झाले ग बाई, ते जड सामान त्या आधीच्या कडून ठेवून घेतलेस.. नायतर हा काय कामाचा नव्हता इथे! गुणाची माझी पोर ती !'

त्या पाप्याच्या पितराने त्याला मी पसंत असल्याचे कळवले. थोडक्यात माझा अकाउंट उघडला.. प्रगतीपुस्तकात लाल खूण नाही यावेळी. पण मी पडले हेडमास्तरीण..मी त्याला काठावरही पास नाही केले..

यावेळेस पोहे जरा जास्तच छान झालेले. आईने त्यात हिरवे मटारही टाकलेले.. हे जाता जाता सांगायला हरकत नाही!

दोन झाले.. आता 'तीसरे पायदान' पर..

एकदा एक आला.. म्हणाला, 'नमस्ते!'

मी चुकून म्हणणार होते, 'हम नहीं समझते..'

पुढे म्हणाला, 'नमस्ते.. इस नाचीज को कवी बभ्रुवाहन कहते हैं!'

इंदूरहून आलेला. कवी होता.

म्हणाला, 'मी लिहितो बभ्रुवाहन इंदौरी नावाने .. कविता माझा श्वास.. माझा उच्छवास..'

मी म्हणाले, 'जा इथून .. मी टाकेन नि:श्वास..'

यावर तो चक्क 'वाह वाह' म्हणाला! 'आपली जोडी जमायला हवी, मग बघा काव्याच्या क्षेत्रात आपण घडवू क्रांती.. सारे कसे बदलून टाकू.. उधळून लावू या निष्ठुर दुनियेच्या काळ्या कुरूप नियमांना .. घडवू एक उष्ण क्रांती..'

मी म्हणाले, 'घ्या उष्ण पोहे .. थंड होतील क्रांतिवीर .. घ्या ओम शांती शांती .. !'

यावर तो गब्रू.. नव्हे बभ्रु.. खूष झाला अजूनच.. म्हणाला, 'तो ये रिश्ता पक्का समझूं .. कुछ मीठा हो जाय?'

बोलता बोलता त्याने चहाचा घोट घेतला.. म्हणाला, 'साखर विसरलात? काही हरकत नाही.. कुछ मीठा हो जाए.. घाला दोन चमचे साखर!'

अशा रीतीने ते पोहेखाण नि चहापान झाले!

मी विचारले, 'उदरनिर्वाहासाठी काय करता?'

तो उत्तरला, 'उदर? मदरच्या उदरातून आलो.. जो चोच देतो तो चारा ही देतो.. जो पोट देतो ..'

'You mean देवळात असता? भटजी? पूजा बिजा ..?'

'छे हो.. क्षूद्र जालीम दुनियेची रीत .. ना जाने मेरी प्रीत.. कविता माझे प्रेम पहिले.. तिच्या पायी जीवन वाहिले..'

चुकून मी म्हणून गेले, 'वा! छान!'

बोलायचे होते उपरोधाने पण माझा टोन चुकला बोलण्याचा.. बभ्रुवाहनला वाटले, मी कौतुक करतेय त्याचे.. थोडीफार बोलणी झाली.. त्याची यमके ऐकली .. शीघ्र कवी .. कवी कसला यमक्या तो .. शब्द जुळारी.. शब्द सुतार!  तो जायला निघाला. जाताना म्हणाला, 'मी आता जाईन उडत पिसांसारखा!'

तो गेल्यावर मी म्हणाले, 'गेलास उडत..'

आईला म्हटले, 'याच्या कवितेच्या रद्दीत पाण्याचा बंब तरी पेटेल का?'

बाबा म्हणाले वैतागून, 'असे काय कुमे, हल्ली सगळीकडे गिझर असतात पाण्यासाठी.. बंब कोण वापरतो हल्ली?' माझ्या आईचा चोखंदळपणा जागा झाला अचानक.. म्हणाली, 'तुम्ही गप्प बसा हो, कुमे तुझेच खरे बाई..'

तर अशी त्या कवीराजाची बोळवण झाली. पोह्यात आईने यावेळी बटाटे टाकलेले किसून.. हे आपले रेकॉर्ड साठी!

इजा बिजा तिजा झाला..

आईला आता पोहे अजून छान बनवता येऊ लागले. सवय आणि काय? पुढचे पोहे केले ना आईने ते बटाट्याच्या कापा टाकून. मला असे जोडीजोडीने कसे काय येतात पहायला कळत नाही. म्हणजे पहिला पैलवान.. दुसरा काडी पैलवान.. तिसरा कवी तर यावेळी चौथा लेखक! लेखक होता पण एका प्रायव्हेट कंपनीत कामाला होता. अकाउंट लिहिता लिहिता कथाही लिहायचा. कवीपेक्षा बरा! म्हणजे कमावता तरी!

मला विचारले, 'काय करता तुम्ही?'

मी म्हणाले, 'हल्लीचे म्हणाल तर मुले पाहतेय. तुम्ही नंबर चार. गंमत म्हणजे मागचा तुमच्याच अलाईड ब्रांचचा होता. कवी होता!'

बाबा वैतागले. म्हणाले, 'अशाने लग्न जमेल का तुझे?'

अर्थात हे बोलले ते तो लेखकू गेल्यावर! काही असो.. होता उमदा. डाव्या डोळयाखाली चामखीळ होता त्याच्या, एखादा ब्यूटीस्पॉट असावा तसा. मला तो प्रथमदर्शनी आवडला. तो म्हणजे चामखीळ नव्हे..तर मुलगा! पण एकदा चोखंदळपणाचा नि परफेक्शनचा ध्यास घेतल्यावर नेहमी निगेटिव्ह पॉईंटस बघावे लागतात. तसे मी पाहिले. उंची पाच फूट सहा इंच. बूट घालून. थोडे विरळ होत चाललेले केस. आता हे सांगायला हवे की मुलाला नीट

पारखून घ्यायला आम्ही न्हाव्याच्या दुकानात असतो तसा आरसा मुलगा बसेल त्याच्या मागे खास बसवून घेतला होता. आम्ही म्हणजे आई नि मी. त्याची मागील बाजू स्पष्ट दिसायला हवी! ह्या मुलाच्या नकळत आरशात पाहिले तर त्याची आताच टकलाकडे वाटचाल सुरू झालेली वाटत होती. एकूण आमचे गुण काही जुळणार नव्हते हे उघड होते.

ही दोन्ही स्थळे एकाच वधूवरसूचक मंडळाकडून आलेली. अनुरूप म्हणे! माझे रूप कुठे नि याचे कुठे! या शेवटच्याने मला काही कठीण प्रश्न विचारले.. जसे 'स्वयंपाक येतो का?' 'नोकरी करणार का?' अर्थात या प्रश्नांची खरी उत्तरे बंधनकारक थोडीच असतात! आणि आईने त्यादिवशी केलेले पोहे फारच मस्त होते. आणि तशी मी दहावी झालेय त्याबळावर मिळणारी नोकरी असल्यास करायला काय हरकत? म्हणून मी दोन्ही प्रश्नांना दिले एकच उत्तर.. 'हो!' याला म्हणतात आत्मविश्वास! त्याच्या बळावर एव्हरेस्टही सर होऊ शकतो म्हणे! मग हे वर संशोधन किस पेड की पत्ती वा किस खेत की मूली? थोडक्यात या नंबर चारचा नंबर काही लागला नाही.

कांद्याचे पोते मागवणाऱ्या माझ्या द्रष्ट्या आईचा मला अभिमान वाटला!

याच्या पुढे मला उत्सुकता होती ती कोण येईल याची. एखादा डॉक्टर वा इंजिनियर? डॉक्टर कठीण. ते लोक कॉलेजातच जोड्या जमवून घेतात म्हणे. नि इंजिनियर .. डिग्री मिळताच निघाले परदेशी. पाचवा कुणी येईपर्यंत काही दिवस गेले.

आईने उन्ह दाखवायला कांदे बाहेर काढले नि दुसऱ्याच दिवशी ते परत पोत्यात भरायला लागले. अजून एक पोह्यांची ऑर्डर मिळाली म्हणून!

यावेळी आला तो थोडा तोतरा होता. म्हणजे माझे नाव घेऊन बोलला, 'ल.. ल .. लो .. चना.. बा.. बाई ..' पुढची सारी वरपरीक्षा मी मनातूनच रद्द करून टाकली. अर्थात रीतीप्रमाणे पोहेखाण नि चहापान झालेच. आईने आज पोह्यात गाजराचे तुकडे टाकलेले. मटार सोबत. पिवळे पोहे .. लाल गाजर.. हिरवे मटार.. वर पांढरे खोबरे.. वा! काय रंगसंगती! FB वर किती लाईक्स नि 'तूस्सी gr8 हो' च्या कमेंट शुअर! इकडे ही मॅच ड्रॉ म्हणजे नकार ठरलेला.. म्हणून मी उगाच गंमत केली.. त्याचे नाव प्रद्युम्न होते म्हणे! मी त्याला एकच प्रश्न विचारला, 'तुमचे स्वत:चे नाव उच्चारायला तुम्हाला किती वर्षे लागली?'

प्रद्युम्न त्यावर हसला नि म्हणाला, 'द.. द.. ह.. हा ...' म्हणून हा हा करत हसला! बरा दिलदार होता हा! आधीच निकाल लावून झाल्याने मी यावेळी त्याचे पॉझिटिव्ह शोधत होते!

तसे कोणाचेही पॉझिटीव्ह काय नि निगेटिव्ह काय .. शोधले की सापडतात! आपल्याला काय हवे यावर अवलंबून ते! तर ही पाचवी फेरी अशी संपली.. सुरू होता होताच!

पुढचे पोहे इतक्या लवकर करावे लागतील असे नव्हते वाटले. म्हणजे अगदी दोन दिवसांत. मुलाचे नाव होते, गिरीधर धरशिंगे पाटील! आता या नावाचा मुलगा फार फार तर कसा असू शकतो? गिरीधर नाव म्हटल्यावर अगदी कल्पना ताणूनही कसा मुलगा येईल डोळ्यांसमोर? पण इथे एक सरप्राइझ होते. मी बाहेर आले तर एक पोनीटेल आरशात पाहात उभी होती. म्हटले याने आपल्या बहीणीस पाठवून दिले की काय? माझ्या येण्याची चाहूल लागताच ती शेपटी वळली. तर ती पोनीटेलवाला तोच होता! गिरीधर.. तो ही असा? म्हणजे एकदम धक्का बसावा असा अवतार!

'हॅलो...I am गिरीधर alias रॉकी .. रॉकी पाटील..'

त्याने हात पुढे केला शेकहॅंड करायला. मला वाटले हा पोहे खाईल की नाही? का याला बर्गर नाहीतर पिझ्झा.. नाहीतर पास्ता..

'नमस्ते!'

मी हात जोडून माझी शालीनता दाखवली! या लांब केसवाल्याचा निकाल मनात मी आधीच लावून टाकलेला. तोच म्हणाला पुढे.. 'आमचा बॅंड आहे..'

बॅंड? बॅंडवाला? या वधूवरसूचकवाल्यांना बॅंडवाला अनुरूप वाटावा? मी पटकन आरशात पाहिले.. त्याचे केस माझ्याहूनही लांब होते. तेवढ्यात तोच म्हणाला, 'आमचा बॅंड आहे. आम्ही पाच सहा मुले आहोत. आमचा खडक संगीताचा बॅंड चालवतो . डिमांड खूप आहे'

'खडक संगीत?'

'रॉक म्युझिक हो.. आमचा बॅंड आहेना. डबल डी म्हणजे.. दगडू धोंडू बॅंड.. म्हणून माझे नाव रॉकी!'

या खडकावर डोके आपटून फुटेल.. म्हणत त्याला बायबाय म्हणालो. वाटल्याप्रमाणे ते पोहे त्याने खाल्ले नाहीतच. आईने खास सोडे घालून केलेले. तसाच टाकून गेला. बशी उचलताना आई म्हणाली, 'त्याचा केस बिस नाही पडलाना बघ पोह्यांत!'

हा गेला नि योगायोग काय की पाठोपाठ दुसरा आला तो ही गायकच ! फक्त या वेळी कुर्त्या पायजम्यातला! चक्क शास्त्रीय

गायक. ओळख करून देत बोलला, 'नमस्कार! मी पंडित उद्धवराव कुंभोजकरांचा शिष्य!'

हे पंडित कोण कोणास ठाऊक! आमच्या घरातील गायकी आरत्या म्हणण्यात सुरू नि आरत्या म्हणण्यात समाप्त! त्यातल्यात्यात मी.. चिकनी चमेली वगैरे चांगली गाते .. पण ते आपले बाथरुममध्ये. आम्हाला त्या पंडितजींची कसली ओळख असणार?

पण एक गायकदाक्षिण्य दाखवत बाबा म्हणाले, 'कुंभोजकर बुवा! वा! प्रश्नच नाही..' असे म्हणत त्यांनी कानाच्या पाळयांना हातबित लावला! बाबा म्हणजे कमाल करतात.. तर हे गायक महाशय होते चांगले. 'संगीतक्षेत्रात हातपाय झाडतोय..' असे स्वत:च म्हणाला तो! अशा हातपाय झाडणाऱ्यावर आई दुगाण्या झाडणार हे नक्की. त्यात त्याला चष्मा! आता मी कसे कॉन्टॅक्ट लेन्स वापरते.. पण कोणाला त्याची माहिती आम्ही नाही होऊ दिली. पण असला ढापण्या .. तेही या वयात?

अर्धा डझनभर अनुभव झाले. आता चोखंदळपणा दाखवण्यासाठी मी चेकलिस्टच बनवून टाकली! त्यात वेगवेगळे पॉईंट घालून त्यांना गुण ठरवून टाकले. म्हणजे उदाहरण द्यायचे तर

एकूण रूप.. डोळे .. केस.. रंग.. कपडे.. उंची.. घरची स्थिती.. वजन..(ते वजन अर्थातच अंदाजाने ठरवत असे मी)..नोकरी वगैरे.. म्हणजे मुलगा समोर आला की झरकन डोळ्यांपुढून चेकलिस्ट यायची की एखाद्याची परीक्षा घेणे सोपे.

मात्र हे समजण्यासाठी मला अर्ध्या डझनाहून जास्त मुलांना बघण्याचा अनुभव घ्यावा लागला ! अनुभवाने शहाणपण येते म्हणतात ना ते असे असावे! बाकी काही असो, आजवरच्या अनुभवातून आईने पोह्यांच्या वेगवेगळया पद्धती मात्र चांगल्याच पिक अप केल्या होत्या! कांदे अर्धा पोतेभर बाकी होते. बाबा जाता येता दोन दोन किलो पोहे आणून टाकायचे. आईला एकदा म्हणालेही मी, 'अगं, एवढे प्रकार पोह्यांचे कशाला? मागच्या वेळेस काय केले आजच्याला थोडीच कळणार आहे?'

आई म्हणाली, 'अगं तसे नाही.. पण आपल्यालाच ते खाऊन कंटाळा येईल ना.. अजून किती वेळा खावे लागतील कोणास ठाऊक?'

हा सूरज का सातवा घोडा गेला नि आजवरच्या अर्ध्या डझनाहून जास्त 'मुलांचा आढावा घ्यायची वेळ झालीय' असे बाबा म्हणाले. ते सूरज का सातवा घोडावाले विशेषण पण

त्यांचेच! तीक्ष्ण विनोदबुद्धी त्यांची! बाबांचे काय .. मंत्रालयात कामाला.. आढावे काय घेतील.. कदाचित चार्ट्स पण बनवतील.. लग्नासाठी स्वत:च अध्यक्ष बनून एखादी 'लोचन विवाह समिती' बनवतील. मग आईला अध्यक्ष बनवून उपसमिती बनवतील. काहीही करू शकतील ते.. म्हटले ना.. तीक्ष्ण विनोदबुद्धी त्यांची म्हणून! आणि वर मंत्रालयात कामाला! त्यांच्या या योजनेत आईने मोडता घातला म्हणून.. नाहीतर सातही मुलांचे प्रेझेंटेशन केले असते त्यांनी, अगदी पॉवर पॉइंट! अर्थात घरात आईपुढे तशी पॉवर त्यांना नाही. त्यामुळे पॉइंट असा की या सगळयात त्या रॉकीच्या केसांइतका लांबलचक कंटाळा आला असता! आणि आता आढावा काय कामाचा.. सारे 'गॉन केस' तर होते! आता गंमत म्हणजे या सातपैकी चारांकडून मला होकार आलेला.. म्हणजे फिफ्टी परसेंट पासिंग!

त्या कांदेपोह्यांच्या रूटीनला बाबा आता कंटाळले असावेत. पण चोखंदळ आईचा उत्साह अजून टिकून होता. ती म्हणायची, 'अजून तर सातच प्रकार झालेत पोह्यांचे..'

अजून काही प्रयोग बाकी होते तिचे!

नंतरनंतर ते मंडळवाले कंटाळले असावेत. खूप दिवसात पोह्यांची ऑर्डर काही आली नाही. त्यात एके दिवशी अचानक संदेश आला, उद्या येणार.. तयार रहा! आईने घाईघाईत ते कांद्याचे पोते उघडले. इतक्या दिवसांत काहींना पात फुटलेली. पोहे मात्र होतेठीक. परत नव्या जोमाने कांदेपोह्यांची जय्यत तयारी सुरू झाली. यावेळी आई त्यात खोबरे किसून वर बारीक शेव घालून देणार होती!

दुसऱ्या दिवशी एका अति गंभीर तरूणाचे आगमन झाले.

'मी अनिरुद्ध द्वारकानाथ ब्रह्मे.. ब्रह्मे आणि ब्रह्मे अध्यात्मिक कन्सल्टन्सीचा प्रोप्रायटर आणि पन्नास टक्के मालक.. FPG ..'

न राहवून बाबांनी विचारले, 'FPG?'

'फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड!'

'वा! छान! अध्यात्मिक ऐकले.. कन्सल्टन्सी ऐकले.. पण अध्यात्मिक कन्सल्टन्सी प्रथमच!'

'हो.. खरंय! आम्ही कोणत्याही समस्येवर अध्यात्मिक दृष्टीकोनातून उपाययोजना सुचवतो. समस्या आणि त्यावर उपाय हा आमचा हातखंडा!'

स्वत: तो ब्रह्मे तिशीतला दिसत होता आणि त्याचे लग्न जुळत नव्हते! अर्थात ह्या त्याच्या समस्येची माहिती बाबांनी काढलेली. आई चोखंदळ असेल सूक्ष्म पातळीवर तर बाबा स्थूल पातळीवर विचार करायचे. त्यामुळे ज्योतिषावर विश्वास नसूनही अशा प्रकारची कुंडली ते बघायला येणाऱ्या सर्वच मुलांची मांडायचे. थोडक्यात स्वत:च्या या समस्येवर या 'ब्रह्मे आणि ब्रह्मे'तल्या पन्नास टक्क्याने काय उपाय केला असेल? पण काही असो त्याच्या अध्यात्मिक व्यक्तिमत्वाने मी मात्र भारावले हे खरे. अशा मुलास नकार देणे .. कितीही चिकित्सक नजरेने पाहूनही कठीण होते. आपल्या देशात अध्यात्मिक कन्सल्टन्सी म्हणजे पैशाचा पाऊस! मनातल्या मनात मी त्याचे अजून पॉझिटिव्ह शोधू लागले! आईला ही असेच वाटत असावे बहुधा. ती गप्प होती आणि आरशात ब्रह्मेच्या डोक्याचा पार्श्वभाग बारकाईने बघत होती. तीही ह्या ब्रह्मेमुळे भारावलेली दिसत होती. चपळाईने तिने पोह्यांवर कोथिंबीर टाकली.. रंगसंगती छान जमून आलेली! आई हळूच माझ्या कानात कुजबुजली, 'कुमे, हा बरा दिसतोय.. चहा तू नको.. मीच..'

'तू कसा देशील बाहेर आणून?'

'मूर्ख.. मी बनवते.. आणून तूच दे..'

तर ते उरलेले निम्मे पोतेभर कांदे .. त्यांचे वांदे होणार की काय? मी आता मिसेस ब्रह्मे होण्याच्या मार्गावर की काय? उगाच आगाऊपणा नको म्हणून मी शालीनतेने खाली मान घालून बसून राहिले. काय करणार पुढे या प्रश्नाला उगीच.. लग्न! असले आचरट उत्तरही नाही दिले. पन्नास टक्के ब्रह्मे निघून गेला. नि मी आतुरतेने वाट पाहू लागले. त्याच्या अध्यात्मिक कन्सल्टन्सीत मदत म्हणून मीही काही करायचे ठरवून ठेवले मनाशी.. फेस रीडिंग.. हस्त रेषा ..की अजून काही? दहावीनंतर करण्याचे कोर्सेस असणारच ना. काही दिवस असे स्वप्नात गेले.

पण हाय रे दैवा!

माझा रेकॉर्ड आजवर सातपैकी चार वेळा पास असा होता.. तो ब्रह्मेने चार बाय आठ करून टाकला. माझ्यासारखीला नकार? काही जणांना खोड असते दुसऱ्याची खोट काढण्याची. असेही त्याचे दात थोडेफार माझ्यापेक्षाही वाकडे होते.. बरेच झाले!

पण तरी ह्या नकाराची गुंज खूप दिवस ऐकू येत राहिली. बाबा परत समिती स्थापना करण्याची गोष्ट करायला लागले. आईने धीर सोडलेला नव्हता अजून. पण म्हणाली, 'कुमे, अशावेळी जरा जास्त स्मार्ट व्हायला पाहिजे बरं..' म्हणजे कुठेतरी मी कमी स्मार्ट होते?

थोडक्यात हा प्रेमभंग.. त्यातून बाहेर पडण्यास त्याच ब्रह्म्याच्या केंद्रात तर नाही जावे लागणार ना असे वाटायला लागले काही दिवस.

पण एकूण या प्रकाराने आई शहाणी झाली. आता एक आड एक दिवस कांदे बाहेर काढून त्यांना उन्हं दाखवू लागली!

त्यानंतर यावेळी मला सांगून आलेला मुलगा दुसऱ्याच कुठल्या विवाह मंडळातून आला होता. इस्टेट एजंट लोकांची कशी साखळी असते तशीच यांची पण असते की काय?

एक सॅम्युएल बलसारा नावाचा मुलगा आला बघायला. आफ्रिकेत असायचा म्हणे! सॅम आला तो एकटाच. तोडक्यामोडक्या इंग्रजीत बोलायला लागला.. आता इथे नम्रपणे हे मान्य करायलाच हवे.. त्याचे इंग्रजी तोडकेमोडके हे मी अंदाजानेच सांगते. मलाच इंग्रजी तोडमोड न करता आले असते तर दहावीला परत ऑक्टोबरला कशाला बसायला लागले असते? आणि नम्र बनायला मागचा तो ब्रह्मदेवाचा म्हणजे ब्रह्मेचा इफेक्ट अजून बाकी होता.. तर त्याचे ते इंग्लिश.. हा सॅम कुठून टपकला कोणास ठाऊक? होता काळाकभिन्न .. आफ्रिकेतून स्पेशल रंग लावून

आलेला की काय कुणास ठाऊक.  तोंडातल्या तोंडात काय बोलायचा कळायचे नाही. याला आई काही झाले तरी फेल करणार.. म्हणून मी त्याचे पॉझिटिव्हस पाहायला लागले. आईने तर त्याच्याकडे लक्ष देणेही सोडलेले. अगदी त्याच्या पार्श्वभूमीचा आरसा पाहणेही सोडलेले. बाबा आता कंटाळले असावेत. कारण तो गेल्यावर त्याचे घोडे दामटवत म्हणाले..'काही प्रॉब्लेम नाही. हल्ली मिळते फेयर अँड लव्हली.. लावून लावून होईल गोरा.'

मला बाबांचा तो वंशवादी विचार नाही पटला. काळेगोरेपणा आपल्या हातात थोडीच असतो? काही असले तरी सॅम मला थोडा आवडला होता. आफ्रिकेत जायची स्वप्ने पाहूही लागले होते मी. पण आईने फार काळ तसे होऊ दिले नाही.. म्हणाली.. 'त्या काळ्या आफ्रिकेत देण्यापेक्षा विहीरीत नाही ढकलणार माझ्या पोरीला?'

ही एक बोलायची पद्धत असणार.

एकतर मुंबईत विहीर कुठून आणणार.. आणि मला तसे चांगले पोहायला येते..हे आईलाही ठाऊक आहे! तर हा बलसारा .. उगवला तसा मावळला हे खरे. या काळ्या बलसाऱ्याच्या वेळी आईने पोहे बनवले ते लाल रंगाचे होते! हे आपले एक रेकॉर्डसाठी!

या सर्व नऊ मुलांच्या प्रकरणात बाबा कंटाळले. किती पोहे.. किती कांदे.. किती मिरच्या..नि लिंबे खर्ची पडले असतील! वैतागून बाबा म्हणाले, 'काही खरं नाही कुमे, आतापर्यंत दहा पोरे झाली असतील.'

बाबा असतील म्हणाले पण आईने 'असती' ऐकले असावे..

ती म्हणाली. 'काय हे? जीभेला काही हाड?'

खरेतर बाबांनी ती समिती न बनवल्याने नि चार्ट न बनवल्याने त्यांचा हिशेब चुकत होता. बाबांचे काहीतरीच.. दहा म्हणे.. अगदी दुर्दैवाचे दशावतार असल्यासारखे बोलणे. मी आईचीच मुलगी.. चांगले स्थळ मिळायला मेहनत तर हवीच!

काही असो, पुढे कांदेपोहे प्रकरण अंगवळणी पडायला लागले. अगदी यांत्रिकपणे ..निरोप आला.. कांदे काढा.. चिरून ठेवा.. मिरच्या ..लिंबू.. पोहे भिजवून ठेवा .. मी आईला सारी तयारी करून देते.. तीच प्रश्नोत्तरे आणि तीच उत्तरे.. आहे काय नि नाही काय! आईचा उत्साह मात्र दांडगा.. अजूनही त्याच उत्साहात ती नवनवीन प्रकारचे पोहे बनवायला घेते. आणि कोणी आवडला तर स्वत: आले- बिले टाकून चहा बनवायला घेते!

त्यानंतर अजूनही काही आले. एकदा एक आला.. नारळ विकायचा .. म्हणाला, 'हे पहा..' म्हणून आपल्या स्वतःच्याच अंगठीने स्वत:चे डोके नारळासारखे खणखणीत वाजवून दाखवून गेला! एक शाळामास्तर आला.. हजेरी घ्यावी तसा, 'मिस लोचन कमलाकर साळुंखे' अशी हाक मारून गेला. तर एक होता तो कुठल्यातरी कुरीयर कंपनीत कामाला होता.. म्हणाला, 'काही होवो.. तुमची डिलिव्हरी वेळेत होईल!' आई थोडीशी चिडल्यासारखी वाटली तर सावरून म्हणाला, 'म्हणजे तुमची पत्रे वेळेत पोचवेन अगदी..'

पत्र काय पोहोचवतोय.. पात्र होता नुसता!

अजूनही आले.. पोहे खाऊन गेले. मला तो लहानपणीचा खेळ आठवला.. 'कोणीही यावे टिकली मारून जावे..' तसे 'कोणीही यावे.. पोहे खाऊन जावे..चहा पिऊन जावे ..'

असे कित्येक नमुने झाले.. काहींना मी फेल केले.. काहींनी मला.. तर काही आईकडून नाकारले गेले! नंतर मी त्या मुलांचा काऊंट सोडून दिला. बाबांना अधूनमधून ते आढावा घ्यायचे झटके येतात.. पण या(ही)बाबतीत आईचा चालतो .. नकाराधिकार आणि एकाधिकार ही.. फक्त आईच्या हातच्या पोह्यांची विविधता

पाहून कौतुक वाटत राहते. आईच ती! पण कितीही सुगरण झाली तरी कांदेपोह्यांत किती विविधता आणणार आहे ती?

आतापर्यंत मी त्या मुलाच्या प्रतीक्षेत आहे. म्हणजे अजून तरी मला तो राजकुमार नाही भेटला जो माझ्या परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकेल. आतापर्यंतचे हे सारे वाचून अंदाज आलाच असेल की कसा राजकुमार हवाय या कुमी नामक राजकन्येला! बघा कुणाला हे आव्हान पेलणार असल्यास.

बाबांनी नवीन कांद्याचे पोते आणून टाकलेच आहे.. आणि आईने पोह्यांच्या एकशे एक रेसिपीजचे पुस्तक!

जय्यत तयारीतच आहोत आम्ही.

आहे कुणी माईचा लाल? थोडे आधी कळवा म्हणजे घेते परत कांदे चिरायला..

# राणीची दोन पत्रे..

ऑडिओ व्हिडिओ –

राणीची दोन पत्रे पत्र क्र. १ - भाग १

राणीची दोन पत्रे पत्र क्र. १ - भाग २

राणीची दोन पत्रे पत्र क्र. २

१.

प्रियतम राज्जास,

जिवलगा,

कधी रे येशील तू?

तू जाऊन एकच दिवस झाला पण एक युग लोटल्यासारखे वाटत आहे. तुझ्या आठवणीने एक एक सेकंद मोजते आहे रे मी.. चोवीस हजार एकशे पाच सेकंदापर्यंत मोजले मी.. नंतर मोजणे सोडून दिले .. मोजले काय की न मोजले काय.. वेळ जायला तेवढाच वेळ लागतो हे लक्षात आले माझ्या .. पण तू नसताना हाच वेळ काळ बनून अंगावर येतो रे.. त्याचे काय करावे?

अगदी काहीच, म्हणजे पंचवीस तीस तासांपूर्वी तू आजूबाजूस होतास.. तुझ्या अस्तित्वाने जिवंत वाटणाऱ्या या घरात तुझी नुसती

चाहूलही जिवंतपणा आणत होती. तुझ्या श्वासातून ओढलेला ऑक्सिजनचा एकेक अणू आणि तू सोडलेल्या कार्बन डाय ऑक्साईडचा एकेक रेणू तुझ्या असण्याची जाणीव करून देत होता .. अगदी कालच रात्री तुझे ते तारसप्तकातून मंद्रसप्तकात लीलया फिरणारे घोरणे कानांना तृप्त करीत होते. येता जाता तुझे मला हाक मारणे.. छोट्या छोट्या गोष्टींसाठी ही.. अगदी शेजारी असलेला पाण्याचा ग्लासही तुला माझ्याच हाताने हवा.. ऑफिसात तुला जायचे.. पण तयारी मी करावी .. तुला काहीही हवे असेल तर मी हवी.. मीच हवी.. माझ्यावाचून तुझे पान ही न हलावे? फक्त तुझा श्वास तुला स्वतःलाच घ्यावा लागतो.. नाहीतर ते ही मी केले असते रे.. आता तू दूरदेशी गेलास.. काही दिवसांत परतशीलही पण तू नसतानाचा एक एक दिवस एक एक युगासारखा वाटू लागेल.. आणि मी नसताना तुझे कसे होईल? तुझ्या ब्रशला टूथपेस्ट लावण्यापासून तुला पांघरूण देण्यापर्यंत.. सारे काही मीच करावे .. तू फक्त आज्ञा करावीस .. छे! आज्ञा कसली? तुझ्या आणि माझ्यात निर्माण झालेले रेशीम बंध.. तू न बोलताच मला कळावे .. की तुझे मोजे जागेवर नाहीत.. किंवा तुझ्या शर्टाचे बटण तुटत आले आहे.. मला अजून आठवते.. तशी गोष्ट जुनी नाही.. आपल्या लग्नालाच तीन महिने झाले असतील तर गोष्टही फार जुनी कशी असेल? तर तुझ्या शर्टाचा उसवलेला खिसा अंगावरच शिवताना हळूच तुला

टोचलेली ती सुई.. एक प्रश्न पडलेला मला .. सिनेमात अशी शर्टाची बटणं शर्ट न काढता का लावतात? त्या संस्कारातून आलेली मी.. खिसा शिवायला दोन टाके मारताना तुला टोचलेली सुई नि त्यावर तू म्हणालेलास, लागी कलेजवा कट्यार! सुईला कट्यार म्हणणे तुझे माझ्याही हृदयात कसे खोलवर रूतून बसले आहे म्हणून सांगू.

तसा तू आहेसच कवी मनाचा. ऑफिसातल्या रूक्ष कामात कवीमन तू कसे जपून ठेवले असशील? मला आश्चर्य आणि कौतुक वाटते. वेळोवेळी तू तुझ्या दोन किंवा चार ओळींच्या, आणि विशेष प्रसंगी त्याहूनही दीर्घ अशा काव्यपंक्ती म्हणतोस ना तेव्हा जीव ओवाळून टाकावासा वाटतो रे. तू आता काही दिवस नसशील तर तुझ्या साचलेल्या काव्यपिसाऱ्याचा निचरा कसा रे करशील याची काळजी वाटते मला. तशी मी तुझ्याबरोबर तुझ्या साथीने किंवा तुझ्या मागोमाग सीतेसारखी यायला तयार होते, पण तुलाच ते शक्य नव्हते म्हणालास. त्यामुळे तुला अन् मला, दोन्ही बाजूंस विरहाग्नीत जळणे आले.

तू गेलास नि तुझी एक एक गोष्ट मी आवरून ठेवलीय घरात. एखादी गोष्ट तुला दिली मी काढून की परत ती जागी ठेवायची सवय नाही रे तुला. मी म्हणाले तुला, त्यावेळी म्हणालास तू, राणी

घरातल्या सर्व गोष्टींना सर्वकाळ तुझ्याच करकमलांचा स्पर्श व्हावा असे वाटते मला. करकमल काय.. हस्तद्वय काय नि दशभुजा दुर्गा काय! किती रे काव्यमय बोलतोस तू. आता तू येईतोवर मात्र गद्य संभाषण ऐकावे लागेल आजूबाजूच्या लोकांचे.

तीन महिन्यात दुनिया इतकी बदलू शकते? त्याआधी आपला साधा परिचय ही नव्हता. रीतीनुसार सारे काही झाले. रीतीरिवाजात तुझ्या घरचे मागे सरणारे नाहीत म्हणालास तू, पटले ते मला. मोठयांच्या व्यवहारात आपला हस्तक्षेप नको म्हणून तू वडीलधाऱ्यांचा मान ठेवलेला मी पाहिला आपल्या लग्नात. लग्नानंतर आपला इकडे राजा राणीचा संसार थाटला आपण. त्याला उणेपुरे तीन महिने झाले. त्यात आनंदाच्या झोक्यावर झुलतेय मी असे वाटतेय.. झोपाळ्यावाचून. तू असा झोक्यावर बसलाहेस.. तुला पायाने झोका घ्यायचा कंटाळा .. मग मी तुला उभी राहून झोका देतेय.. तू उंच झोक्यावर झुलतोयस.. असे चित्र मला दिसतेय रे स्पष्ट .. आणि तू झुललास काय की मी.. आपण दोघे वेगळे थोडीच आहोत रे?

तू गेलास नि मी वेडीपिशी होऊन गेल्या तीन महिन्यातला दिवस अन् दिवस स्मरते आहे. नव्वद दिवस म्हणजे किती क्षण रे? गणित कठीण आहे, पण त्या क्षणाक्षणावर तुझेच नाव लिहिले आहे रे. जणू मला स्वतंत्र अस्तित्वच नसावे. आणि तू आणि मी यांचे स्वतंत्र अस्तित्वच नसणे यासारखी सुखद भावना नाही रे दुसरी. म्हणजे बघ ना.. घोरावे तू.. झोप माझी व्हावी. खावेस तू अन् पोट माझे भरावे.. पसारा करावास तू.. आवरून मी ठेवावा.. कवितांच्या ओळी ऐकवाव्यास तू.. कान माझे तृप्त व्हावेत.. किती गोष्टी अशा सांगाव्यात?

एक सांगू? हसू नकोस. तुला नावाने हाक मारतेना त्यामुळे एका गोष्टीला मुकते मी.. नाहीतर राजा तुला राया, सजणा, प्रियतम, चितचोरा अशा काय काय विशेषणांचा विशेषनामासारखा वापर केला असता मी! तसा अजूनही करू शकते.. बघ हां.. काहीतरी आलेय मनात ते लिहिते.. हसलास तर बघ..

एका अलकापुरी राज्यात एक राजकन्या आपल्या राजकुमाराची आर्त नजरेने वाट पाहात बसली होती. राजकन्या कसली.. साधीसुधी मुलगी होती ती.. पण राजकुमाराच्या येण्याकडे नजर लावून बसलेली .. तो कुठल्यातरी अबलख दुचाकीवर स्वार होऊन येईल .. राजकुमार तो.. त्यामुळे ती आपोआपच राजकन्या

होऊन जाईल ना.. आणि नंतर राजाची राणी! एके दिवशी तिचा तो राजकुमार आलाच.. ल्युनावर बसून. त्याने तिला नि तिने त्याला पाहिले. नजरबंदीच झाली जणू.. त्याने तिचे चित्त चोरले.. ह्रदयाच्या कप्प्यांत जाऊन बसला तो.. तिचा तो चितचोर सजणा .. राया .. प्रियतम.. पुढे काय? प्रीतीच्या दोन पाखरांनी मग आकाशी एकत्र झेप घेतली.. राजकुमार आणि त्याची राजकुमारी दोघंही प्रेमाच्या अथांग सागरावरून उन्मुक्त आणि स्वच्छंद विहरू लागले .. राया, या गोष्टीतली राजकन्या मीच आहे रे.. आणि राजा तू!

आज तू दूरदेशी गेलास ना म्हणून चित्त थाऱ्यावर नाही माझे. एकेका क्षणाची आठवण होऊन मन कसे मोहरून जाते. कधी रे येशील परतून.. जिवलगा..

तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसलीय तुझी ही साजणी..

एक विचारू? सांगशील? तुलाही माझी तितकीच आठवण येतेय का रे तिकडे? विरहाच्या वन्हीत तू ही तितकाच जळतोयस का रे? मला शक्य असते ना तर पक्षी बनून उडत उडत तिकडे आले असते.. आणि खिडकीतून एका माणसाची माझ्याविना उडणारी धांदल पाहिली असती.. पदोपदी तुला माझी आठवण येत असणारच ना राजा.. फक्त ती कशी येते ते एकदा तुझ्या खोलीच्या

बाहेरील झाडाच्या फांदीवरून पाहून परत उडत आले असते इकडे. पण हे एखाद्याचा जीव पोपटात नाहीतर बेडकात असणे लहान मुलांच्या गोष्टीतच असते रे..

पण एक सांगते शेवटी.. परीकथा कुणी कितीही म्हणोत काल्पनिक, त्या सत्यात उतरू शकतात.. कुणाचा विश्वास नसेल तर त्यांनी माझ्याकडे पहावे!

एखाद्या परीकथेसारखेच आहे रे सारे.. आणि ते आनंदात नांदू लागले .. तसेच सारे!

हे पत्र मी तुला आल्यावर वाचायला देईन.. तेव्हा हसलास तर बघ.. गाठ माझ्याशी आहे.. आणि साधीसुधी नव्हे .. तर साता जन्माची.. लग्नगाठ..

तुझीच

राणी

------

पत्र - २

प्रिय राजाभाऊ,

राजाभाऊ! हे रे कसले नाव ठेवलेले? तुझ्या घरचे कामच असले! तू माझा भाऊ नाहीस पण नावच हे. राजाभाऊ! मी तुझी राणी. नावाने का होईना. पंचवीस वर्षात तेवढीच हौस पुरवलीस बघ..

तू गावी जाऊन महिना उलटला. यायची वेळ जवळ आली की एक अनामिक हुरहूर वाटू लागते. गेल्या महिन्यातला एकेक दिवस मी एकटीने किती आनंदात काढला .. कोणाची पाठून भुणभुण नाही.. राणी हे दे, ते दे नाही, हे कुठेय.. ते कुठेय नाही .. येताजाता ऑर्डरी सोडणे नाही .. मी असा स्वातंत्र्याचा एकेक क्षण भरून घेत होते माझ्यात. मी आत घेतलेला ऑक्सिजनचा एकेक अणू नि सोडलेला कार्बन डायाॅक्साईडचा एकेक रेणू हेच सांगतोय.. राणी, गेल्या तीस दिवसांत किती उन्मुक्त स्वातंत्र्याचा अनुभव घेतलास तू!

किती दिवसांत ती शांत झोप झाली माझी. नाहीतर तुझे ते घोरणे.. माझ्या झोपेचे खोबरे करणारे. आता तू नव्हतास तर सारे

कसे शांत शांत. इतक्या वर्षात अगदी प्रकाशचे माक्याचे आयुर्वेदिक तेल डोक्यावर  थापल्यासारखी शांत झोप आली बघ मला. लवकरच तू परततोयस.. परत ते तुझे तारसप्तकातले घोरणे सुरू आणि माझा निद्रानाश ठरलेला.. मग कितीही माक्याचे तेल थापा की नवरत्न तेल. आधी तुझा जा ॅब कसा फिरतीचा होता. मधून मधून विरहवेदना झाल्यातरी थोडी मोकळीक मिळायची. पण गेल्या दहा वर्षात तुझी ती नोकरी बदलली. फिरती बंद झाली. आता इतक्या वर्षांनी तू गेलास बाहेर. तुला सांगते गेल्या महिन्यातला एक क्षण ही असा नसेल ज्यात मी सुटकेचा निश्वास टाकला नसेल. एक महिना म्हणजे तीस दिवसांचे तास किती.. मिनिटे किती नि सेकंद किती.. मी काही गणित करत बसत नाही .. कारण असे क्षण क्षण मोजत बसले तर वेळ जायला कमी काळ जातो की काय असा भ्रम होतो.. मी आपल्या स्वातंत्र्याचे असे क्षण म्हणून मोजण्याच्या फंदातच पडत नाही.

गेल्या कित्येक वर्षांपासून तुझा तो आळशीपणा पाहून माझे डोळे दिपले म्हणू का? सगळ्या छोट्यात छोट्या कामासाठीही तुला राणीच हवी. अगदी सकाळचा चहाचा कप ते रात्री अंगावरचे पांघरूण .. सारे हाती हवे. मोजे तर हमखास हरवतोस तू नि

शर्टावरची बटणं तोडणं तुझा छंदच असावा असा संशय येतो कधीकधी मला. ते सिनेमात अंगावरतीच शर्टाचे बटण लावणे रोमँटिक असेलही.. पण एकदा तशी शिवायला गेले नि टोचली सुई तुला तेव्हा किंचाळत ओरडलेलास तू.. अजून नाही विसरले. आता बटण तुटो की शर्टाचा खिसा फाटो.. सिनेमातल्यासारखं शर्टबिर्ट शिवणं बंदच केलं मी तेव्हापासून. सिनेमावाले काय, कायपण दाखवतात!

तर तुझे ते परावलंबित्व पाहून मला तर वाटते तू स्वतःचा श्वास घेणे पण माझ्यावर सोपवशील की काय! म्हणजे बघ ना, जेवण मी बनवावे .. भुरके तू मारावेस .. घोरत तू रहावे.. झोप तुझी व्हावी नि रात्रभर जागरण मी करत रहावे.. ऑक्सिजन तू शोषावास.. कार्बन डाया ॅक्साइड माझ्यासाठी सोडावास.. असा कसा रे तू गेल्या काही वर्षात असा झालायस? ही राणी तुझी एकेकाळी राणी होती, ती आता नावापुरतीच राणी राहिलीय रे तुझ्यासाठी.

आणि खरं सांगते, तू गेलास नि कसं शांत वाटतंय .. तुझे ते थोड्या थोड्या गोष्टींवर चिडणे.. तशी सवय झालीय आता. इतकी की न चिडलास तर चुकल्या चुकल्या सारखे वाटते मला. तू म्हणायचास, तू अँग्री यंग मॅन आहेस.. आता पन्नाशीत अँग्री

ओल्ड मॅन म्हणवून घेशील, पण चिडणे काही सोडणार नाहीस का रे? तुझ्या कवितांतूनही तू असंतोषाचे उग्र हुंकार सोडतोस म्हणे.. हे शब्द तुझेच. ऑफिस सांभाळून तू असा कवितेच्या ओळी रचायचास आधी.. काव्यपिसारा तुझा .. किती रोमँटिक .. तो रोमँटिकपणा अगदी अँटिक झाला त्यालाही किती वर्षे उलटून गेली.. काव्यपिसाऱ्याचा आता काव्यपसारा झालाय. आता तुझ्या कविता तू मधून मधूनच ऐकवतोस मला.. त्यात तुझी तक्रार असते.. मी तुझ्या कविता ऐकायला तयार नाही म्हणून. मला सांग, घरचे सारे सांभाळून तुझ्या अखंड असंतोषाचे उद्विग्न आणि उग्र फुत्कार ऐकायला वेळ कुठे आहे रे मला? आणि मी तुझे कवितावाचन ऐकले नाही की त्यावरही तुझ्या असंतोषाचा उद्रेक होत राहातो.. तो अलग!

मी लहान होते ना तेव्हा मला परीकथा सत्यात उतरतात असा विश्वास होता. अबलख वारूवरून येणारा नि अल्लड राजकन्येस अल्लद उचलून नेणारा राजकुमार सत्यात येतोच.. अशी भाबडी होते मी.. तसा कुणी न कुणी येत असतोच, उचलूनही नेत असतोच.. पण परीकथा संपते ना ती लग्नानंतर. 'दे लिव्हड हॅपीली एव्हर आफ्टर' एवढ्या एका वाक्यात नंतरच्या साऱ्या आयुष्याचे

सार सांगू पाहतात त्या परीकथा सत्यात कशा असतील? अगदी हल्लीची भाषा वापरायची तर 'डेव्हिल इज इन डिटेल्स' म्हणतात ना तसे आहे हे.. खरंच आहे की नाही ते?

हे पत्र तुला कित्येक वर्षांनंतर लिहितेय. तुला दाखवणार ही नाही कदाचित. कदाचित दाखवेन ही.. तेव्हा रागावून बसू नकोस .. चिडू नकोस.. शेवटी काय साता जन्माची गाठ पडलीय.. माझी आई म्हणायची लगीन गाठ म्हणजे राणी, गाठ पडली ठकाठका..! आणि ती ही साधीसुधी नाही .. तर साता जन्माची!

तुझीच,

राणी

# एका डासीचे मनोगत..

ऑडिओ व्हिडिओ –

एका डासीचे मनोगत

तुम्हाला सांगते.. मागे दूर गावाबाहेर कुणा एका स्वामींचे प्रवचन चालले होते. माणसांची गर्दी.. उघड्यावर सगळे बसलेले. माझी ड्यूटी लागलेली तिकडे. स्वामीजींच्या आजूबाजूस मच्छरवर्गाने फिरकू नये म्हणून हिरव्या हिरव्या धुराच्या तबकड्या लावलेल्या. सांगत काय होते.. तर ते स्वामी सांगत होते.. 'मनुजा,आयुष्याचा खरा अर्थ शोध.. जा जगात आला आहेस ते कशासाठी याचा विचार कर. म्हणजेच तुझ्या जीवनाला अर्थ येईल.' लोकं मान डोलवत ऐकत होते. मी पण थबकून जवळच्या भिंतीवर बसून थोडे ऐकत होते. माझ्या मैत्रिणी आणि मी खूश होतो. आजूबाजूला इतके लोक एकाच ठिकाणी सापडलेले .. असे भरगच्च ताट वाढलेले पाहिले की नुसते बघूनच तृप्त व्हायला होते.. तरी काही चावे मात्र घेतले मी. स्वामी सांगत होते त्याचा अर्थ मला मात्र चांगलाच समजला.. तिकडून उडून पहाटे घरी आले. अंथरूणाला पाठ टेकली. खरेतर आज उडणे जास्तच झालेले, तरीही डोळ्याला डोळा लागेना.. त्या प्रवचनानंतर मी ही आपल्या मच्छरत्वाबद्दल विचार करायला लागले..

काही कडू काही गोड ..

म्हणजे काय सांगू ..

आमचा बाई जन्मच असा. असा म्हणजे कष्ट आणि मेहनत. म्हणजे आमचे पुरूष वर्गातले सारे.. उगाच कोणा मनुष्याला चावून नांग्या मोडून घेणार नाही कोणी. ना ही कोणाच्या हातून चापटी खाऊन जीवाचा अंत करवून घेणार. ते सारे आम्ही करावे. म्हणजे पुरूष वर्गातले सारे मारे उकिरडे फुंकणार.. बिनधास्त फिरणार. माणसाच्या कृपेने भरलेल्या कचरापेट्यांवर स्वच्छंद उडणार.. कधीमधी कुणी डीडीटी का कायतरी धूर मारलाच तर त्यांना थोडाफार धोका. खरंतर धूर खाऊन खाऊन सवयही झालीय. त्यामुळे त्या फवाऱ्याने काही दुबळेच मच्छर धारातीर्थी पडतात नि बाकीचे दुप्पट जोमाने परत कामाला लागतात. नाहीतर कुठल्या अपघातात कुणी पुरूष मच्छर गेलाय? बात नको.

.. आणि त्याउलट आम्ही?

.. स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी.. मारत नांगी गुं गुं गाणी! नांग्या रोवून रोवून एकेका माणसाचे रक्त शोषावे.. त्यासाठी घराघरात कुठून कुठून घुसण्यासाठी प्रयत्न करावे.. राब राब राबावे, तेव्हा कुठे चार नांग्या रक्त मिळणार प्यायला. त्यात हा माणूस प्राणी.

मच्छराला शत्रू मानून काय काय नाही करत. कुणी कसले पांढरे मलम काय चोळेल.. कुणी वासाच्या नि धुराच्या कांड्या काय लावेल.. घराघरात जाळया लावून तर मच्छरांस प्रवेश बंदीचे बोर्डच लावतात ही माणसं.. शहरात तर उंच उंच इमारतींतल्या घरांत उडत उडत चढताना दमछाक होते नुसती. या सर्वांतून माणसाच्या घरीदारी पोहोचावे तर जाळीजाळीच्या मच्छरदाणीत झोपतात सगळे. त्यातून आत शिरण्याइतकी उत्क्रांत अजून झाली नाही आमची मच्छर जाती अजून. तरी सारे अडथळे ओलांडत ओलांडत मनुष्याच्या जवळ पोहोचावे.. कुठेतरी उघडी चामडी पाहून नांगी घुसवावी नि झटकन उडून जावे. एवढे कौशल्य पंखांत यायला वेळ नि मेहनत दोन्ही लागतात. मच्छरजन्माची हीच तर कहाणी. असे म्हणतात खूप पुण्यानंतर हा मच्छरजन्म लाभतो. पण मनुष्याचा भरवसा काय सांगावा? एका चापटीतही कधीकधी जीव गमवावा लागतो. असे क्षणभंगुर आयुष्य वाटेला आले.. त्यात कुणाचा जीव कधी जाईल सांगता येत नाही. घरातून कामाला निघताना आज परत घरी येणार की नाही .. काही सांगता येत नाही. तर आम्हा स्त्री डासांचे आयुष्यच असले. तरीही अगदी जिवाची बाजी लावत रक्त गोळा करावे.. शेवटी मच्छर जन्माची सार्थकता डेंग्यू आणि मलेरियाचे जंतू पसरवण्यातच आहे हे समजून.

तसे श्रीयुत मच्छर येतात घरी अधूनमधून. वेळात वेळ काढून. आमची तशी बहुतेक वेळा रात्रपाळी. काही असतात दिवसपाळीच्याही मच्छरी. पण त्या सुदैवी मच्छरींची संख्या कमी. सुदैवी म्हणजे दिवसाउजेडी कामावर जातात नि रात्री छान ताणून देतात. आमच्या मुख्य नियंत्रण विभागातून त्यांना डेंग्यूची जबाबदारी दिली जाते. तशी त्यांना रिस्क थोडी अधिकच. एक तर माणूस तेव्हा जागा असतो. त्याला बेसावध पकडून चावा घेण्याचे तंत्र सगळयांनाच जमते असे नाही. त्यामुळे आमच्या काही जमातीतल्यांनाच ही डेंग्यू ड्यूटी लावून दिली जाते. आम्ही आपल्या कामकरी मेहनती मच्छरी. बहुतेक सगळयांना मलेरिया ड्यूटी लागते. एकदा का तो जंतू आमच्या शरीरात शिरला ना की आम्हाला कर्तव्याचे भान येऊ लागते. कधी एकदा मलेरिया प्रसार आणि प्रचाराचे नीयत कर्तव्य करतो असे होऊन जाते. एकदा का ते मलेरियाचे जंतू कुण्या माणसाच्या शरीरात सोडले की मच्छरी जन्माबद्दल धन्य धन्य वाटायला लागते. आजवरच्या सर्व हाल अपेष्टांचा विसर पडायला लागतो. शेवटी मच्छर जन्माला आलो तर कुणाच्या हाती मरण येण्याआत हे झाले की कृतकृत्य होऊन मरायला मोकळे असे वाटायला लागते हे खरे. त्या मानाने आमच्या पुरूष मच्छरांच्या आयुष्याला तसा विशेष अर्थ नाही. नुसतेच निरूद्देश भटकणे आणि काही नाही. म्हणजे ते स्वामी म्हणाले तसे

जीवनाचा अर्थ आम्हा मच्छरींच्याच आयुष्याला आहे, नाही का? माणसाला चावण्याचे काम आम्हा स्त्री मच्छर.. म्हणजे मच्छरींकडेच लावून दिलंय. पूर्व जन्मीचे संचित असेल म्हणून हा मच्छरीजन्म मिळत असावा आणि काय. तसं असलं ना तरी कधी कधी जीव कावतो. तसे मिस्टरपण कामावर जातात. पण दिवसाउजेडी. रात्रपाळी कधीमधीच. बाकी येऊन पाय पसरून झोपले असतात दिवसभर. पण बाईच्या जातीला हे हाल का सुटले आहेत? अशावेळी वाटत पुढचा जन्म पुरूष मच्छराचाच मिळू दे रे देवा. पण ते तात्पुरते.

तर जाता जाता एक काही बघितले ते सांगून जाते. जाते म्हणजे ड्यूटीवर. संध्याकाळची वेळ ही. घराघरावर आक्रमण करायची. कुठे खिडक्या दारे उघडी आहेत की नाहीत शोधून आत घुसले की त्या दिवसाची निश्चिंती. तर अशीच एकदा एका घरात शिरलेले. तिकडे एक दिव्याचा डबा असतो त्यात माणसं हलता बोलताना दिसतात. टी व्ही की कायतरी म्हणतात म्हणे. तर त्यात एक माणूस उभा होता मोठया ताठ्यात, नि त्याची बायको त्याच्या पाया पडत म्हणत होती.. मैं चरणोंकी दासी.. दासी म्हणजे काय कोणास ठाऊक.. पण ती बाई नक्कीच त्याच्या पाया पडून गयावया करत

होती.. म्हणजे दासी म्हणजे काहीतरी नोकराणी वगैरे असावे.. मी उडता उडता थबकून ते पाहात होते.. म्हटले अशी असते की काय ही माणसाची दुनिया? चरणोंकी दासी वगैरे? त्यावेळी मला मच्छरी असण्याचा अभिमान वाटला.. मी डासी होते आणि आहे.. पण हे दासीपण वगैरे आमच्या मच्छर जमातीत नाही.. माणसाच्या जमातीत असावे कदाचित सारे.. आम्ही मच्छर तसे प्रगत आहोत..

.. म्हटले ना हा मच्छरजन्म नक्कीच पूर्व संचितामुळेच मिळत असावा..

# एक सुखचित्र..

ऑडिओ व्हिडिओ –

एक सुखचित्र

पंचवीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे.. म्हणजे मी आणि माझी मैत्रीण जाई असे चाललो होतो.. इतक्यात तिकडून तो आला.. त्याच्या बाईकवर स्वार.. धूम चाललेली त्याची बाईक.. जवळून एक थम्सअप वाले क्रेट्स घेऊन गाडी चाललेली.. त्या बाईक स्वाराने आपली बाईक उंच हवेत उडवली.. वरच्या कप्प्यातून एका हाताने बाटली उचलली.. आपल्या दातांनी तिचा बिल्ला उडवला .. बाईक खाली येईतो आपल्या तोंडाला बाटली लावून ती गटागटा रिकामी केली.. ती धूम बाईक अजून वेगाने पुढे निघाली .. जाई म्हणाली, "काय त्या थम्सप पायी जीव धोक्यात घालतोय.."

मी म्हणाले, "छे गं.. जो थम्सअपसाठी असे करेल तो माझ्यासाठी काय नाही करणार? ते घोड्यावरून राजकुमार यायचे दिवस गेले. आता फक्त असे राजकुमार येतील.. आपल्या दुचाकीवरून.. आपल्या जिवावर उदार होतील नि.."

"आणि काय? कोल्ड्रिंक पितील?"

"छे ग! तू अगदीच अनरोमँटिक आहेस.. कसला होता ना तो.. काय ती त्याची बाईक .."

"त्या बाईकसाठी तू त्याची बायको व्हायला तयार आहेस की काय?"

"अर्थातच .."

मी म्हणाले नि तथास्तु म्हणून आकाशवाणी झाली.. तो बाईकस्वार माझ्या मागे येऊन उभा राहिला .. जाई म्हणाली,

"अगं राधे .. तो बघ तुझा कन्हय्या .. मी निघते कशी.."

जाई जायला उठली.. तिच्या पांढऱ्या कपड्यांकडे पाहात मी म्हणाले .. भला उसकी कमीज मेरे कमीज से सफेद कैसी?

जाई जाईपर्यंत आवाज घुमत राहिला .. सफेदी की चमकार.. किसी भी अन्य डिटर्जंटसे ज्यादा सफेद..

मी ऐकत राहिले. तो कन्हैया जवळ येऊन उभा राहिला.. त्याच्या अंगात रेमंडचा शर्ट नि रेमंडची पँट होती.. त्यामुळे तो मला कम्प्लीट मॅन वाटत होता..

मी माझे सर्व दात दाखवत हसले त्याच्याकडे पाहात.. तो ही हसला.. क्लोज अप टूथपेस्टच्या ॲड सारखे आम्ही दोघेही हसलो.. दातांनी बिल्ला काढणारा तो.. मला पाठून विको वज्रदंतीच्या जाहिरातीतील गाणे ऐकू येत होते.. म्हटले अगदीच

वज्रदंती आहे हा. आणि उत्साह आणि शक्ती किती? नक्कीच हॉर्लिक्स पित असणार .. नाहीतर सिंकारा तरी..

त्याला म्हटले ही मी, "इतक्या उड्या मारल्यास.. कुठे लागले तर नाही ना?'

तो म्हणाला, "काळजी करू नकोस.. आयोडेक्स आहे ना.. आह से आहा तक.. आयोडेक्स मलिए काम पे चलिए.. आयोडेक्स असताना मला कसली काळजी? "

म्हटले खरंय.

"लहानपणापासून तू असाच धाडसी का रे?"

मी विचारले तर म्हणाला, "आय ॲम अ कॉम्प्लान बॉय.. पण नाही. आता तुला सांगतो, बूस्ट इज द सीक्रेट ऑफ माय एनर्जी.."

"अवर एनर्जी.. फक्त तुझीच नाही रे एनर्जी .. चल.."

त्याच्या बजाज पल्सरवरून आम्ही पुढे खूप फिरलो. त्याच्याबरोबर फिरताना मला वाटत होते.. कुछ खास है हम सभी में..

आम्ही शहरातल्या सर्व बागांतून फिरलो.. समुद्रकिनारी डोळ्यांत डोळे घालून एका शहाळ्यातून नारळाचे पाणी प्यायलो .. 'दो दीवाने शहर में' हे गाणे ही गायलो असतो.. पण जमले नाही.

चौपटीवर भय्याच्या हातची एक भेळ वाटून खाताना वाटले.. क्या स्वाद है जिंदगी का..!

त्याला एकदा म्हणाले मी, 'तू मेरा हीरो है' तर दुसऱ्या दिवशी तो आला हीरो सायकलीवर बसून. म्हटले

"तुझी बजाज पल्सर .. कुठेय?"

तर एकदम रोमँटिक होत म्हणाला, "तुझी काय.. हमारी.. हमारा बजाज म्हण.."

अशी बजाज पल्सरवर बुलंद भारतात आमची प्रेमकथा बहरली. त्यावेळी जीवनसाथी डॉट कॉम वगैरे नव्हते .. पण डायरेक्ट असल्या जोड्या जमत असत. आमची ही जमली म्हणजे चेरी ब्लाॅसम आणि बाटा शूजची जोडी जणू.. म्हणजे घरून निघताना म्हणायचे.. आपने जूता चेरी ब्लाॅसम किया क्या..? पण जूतेच काय.. आमची किस्मतही चमकली .. म्हणजे घरी आमच्या प्रेमकथा कळली..

मग त्याचे रीतसर घरी येणे झाले. पहिल्यांदा तो आला.. दो बूंदोंवाला उजाला घालून धुतल्यासारखा पांढरा शुभ्र शर्ट घालून.. एकटाच. मी स्वतः चहा बनवलेला. हे सोपे होते.. म्हणजे तो भेटण्याआधी वधूपरीक्षेसाठी म्हणजे मला बघायला दोन स्थळं

येऊन गेलेली. त्यांच्यासाठी चहा नि पोहे बनवलेले मी.. पण ती परीक्षा होती.. तिच्या रिझल्टचे टेन्शन होते.. पण तो आला तेव्हा जणू पेपर फुटल्याने रिझल्ट ठाऊक होता.. म्हणून ब्रुक बाँडचा सुवास घरभर पसरलेला.. त्यात बादशहा चाय मसाल्याची भर.. आणि सहकार मसाले वापरून बनवलेले कांदे पोहे. सगळयांनी मिटक्या मारत खाल्ले ते. मग नंतर त्याच्या घरचे लोक आले. तेव्हा स्वाद आणि सुगंधाचा राजा असलेले बादशहा मसाले वापरून जेवण झाले.. अगदी कुर्रम कुर्रम पापडासकट. सासूबाई सासूच्या तोऱ्यात म्हटल्यावाचून राहिल्या नाहीत मात्र तेव्हाही .. "आम्ही बुवा असली मसाले वापरतो.. एम् डी एच मसाले." ते गेल्यावर आई म्हणाली ही.. "वापरा की त्यात काय एवढे! त्यात काय भला इसके मसाले मेरे मसालेसे तिखटजाळ कैसे असले काही थोडेच आहे!"

काही असो.. जेवण छान झाले. जरा जास्तच जेवले सारे.. पोटावर हात ठेऊन ढेकर दिला माझ्या होणाऱ्या सासऱ्यांनी. तशी गोळयांची बाटली पुढे करत बाबा म्हणाले, "हाजमोला सर.."

हाजमोला खाऊन जेवण पचवत बसले सारे.

एका थम्सअप पायी तो मला भेटला तेव्हा. आता मला सुखचित्र दिसू लागले नवीन. लवकरच मी त्या घरची सून होणार. मी मजवर भुलल्यासारखी तासन तास त्याच्या विचारात बुडून जाऊ लागले. खुश्बुदार अँटिसेप्टिक क्रीम बोरोलीन म्हणा की विको टर्मरिक म्हणा .. फेअर अँड लव्हली सोडून सगळी क्रिम लावून त्वचेची काळजी घेत राहिले. पाँड्स 'ड्रीम'फ्ला◌ॅवर टाल्क लावून तासन तास मी स्वप्ने पाहात लोळायचे .. बाजूला कछुआ छाप मच्छर अगरबत्ती जळतेय.. डोक्यावर उषा फॅन फिरतोय.. मी बाँडेड लेड वाल्या नटराज पेन्सिलीने त्याला पत्रे लिहितेय.. आम्ही तसे भेटायचो दररोज तरी पत्रे लिहायची मजा काही औरच नाही का? त्याला मी नि मी त्याला पत्रे लिहीत राहिली.. म्हटले तू नि मी.. फेव्हिकॉलच्या जोड सारखे आहोत अगदी. तर त्याने लिहिले .. खरंय. अगदी अंबुजा सिमेंट सारखे मजबूत! लग्नाच्या दिवसाची वाट पाहात सुखस्वप्नात डुंबत राहिले. मनातल्या मनात जणू काही मेलडी खात.. 'इतनी क्यूं खूश हूं मैं हे' खुद जान जाईए म्हणत!

प्रत्यक्ष लग्न लागले.. आमच्या लग्नात बारातियोंका स्वागत पानपराग से होना चाहिए इतकीच अट होती. ती पूरी केली. म्हणजे तेव्हा पानमसाला लोकं खायचे. आजचा गुटखा त्याचा कानामागून

येऊन तिखट झालेला सावत्र भाऊ.. काय असेल ते असो.. लग्न मंडपात वातावरण कसे प्रसन्न होते. रजनीगंधा अगरबत्ती लावल्यासारखे सगळीकडे.

लग्न होऊन सासरी आले. अगदी सगळे सामान व्ही आय पी च्या मोठ्या सूटकेसमध्ये भरून. अहेरात काय काय मिळावे? छोट्या मोठ्या रकमेच्या पाकिटांबरोबरच काही भांडीकुंडी. पण सगळ्यात आठवतो तो प्रेस्टीज कुकर.. आजूबाजूला कोणी नाही पाहात तो म्हणालेला.. "जो बीवीसे करे प्यार वो प्रेस्टीजसे कैसे करे इन्कार?" मी तेव्हाही लाजलेले.. मग हनिमूनला भारतभर हिंडणे झाले.. टेस्ट ऑफ इंडिया अगदी..

पुढे काय? नेहमीचेच.

तो आता बाईक चालवत नाही. सुझुकीची मारूती 800 चालवत ऐटीत जायचा कामावर. मी घरीच जिंदगीके बादभी सांगत एल आय सी च्या पॉलिसी जिंदगीच्या पहिलेही ले लो म्हणत एजन्सी चालवायची. पुढे दोन पोरं झाली. कामाचा रामरगाडा वाढला.. पण दिवस बदलत गेले. नवनवीन मशिनं आली.. ढेरसे कपडे सर्फ मध्ये भिजवून घडी डिटर्जंट नाहीतर डबल बी साबणाने

घासून कपडे धुवायची मी आधी. पाठ दुखली तर पीडाहारी झंडू बाम लावायची. शेजारची पंजाबीण कपडे वाळत घालताना भले सांगत असायची सर्फ सिर्फ महंगा है.. तिला माझ्या पांढऱ्या साडीकडे बोट दाखवत सांगायची.. सस्ती और अच्छी चीज में फर्क तो होगा ना.. सर्फ की खरीददारीमेंही समझदारी है.. पुढे वॉशिंग मशीन आले. व्हर्लपूल व्हर्लपूल गात गात कपडे धुण्याचा वेळ वाचायला लागला. अगदी राखुंडीने भांडी घासायची लहानपणी ती मी आता विम ने भांडी घासून त्या भांड्यांत आपले प्रतिबिंब पाहू लागले. पोरांना मोठे होताहोता दो मिनट मध्ये मॅगी बनवून खाऊ घालू लागले. पोरंही ॲक्शन का स्कूल टाइम म्हणत टा ॅक टा ॅक बूट घालून शाळेत जायची. पोरं मोठी झाली आता. कॉलेजात जायला लागली ..

तशी आता पन्नाशी आली.. तो डाबरका च्यवनप्राश घेतो अगदी आधीपासून. त्यामुळे तंदुरूस्त आहे. .. कधी लाडात आली की पोरं हाक मारतात .. मम्मी.. आज उशीर होईल .. कॉलेजातून मूव्हीला जातोय.. बाजूला तो उभा असतो.. म्हणतो.. "मम्मी?"

मी म्हणते.. त्वचासे मेरी उम्रका पताही नहीं चलता ना?

एकूण सगळे काय आनंदात चाललेय.. हल्ली कुणी कॅमेरा वापरत नाही .. कॅमेराच नाही नि त्याची कोडॅक फिल्म पण नाही. तेव्हा घेतलेले हॉट शाॅट कॅमेरातले फोटो नि कोडॅक मोमेंटस अजूनही मी मध्ये मध्ये काढून बसते.. तो पण बघतो बसून .. इतकी वर्ष सगळे फोटो सांभाळून ठेवलेत मी.. पाहून पामोलिव्ह का जवाब नहींच्या सुरात म्हणतो .. "राधा तेरा जवाब नहीं!"

.. मी ही हे सारे कोडॅक मोमेंट्स सारखे एका सुखचित्राचे क्षण मनात जपून ठेवतेय..

## ।। पत्नीधर्माचे स्तोत्र ।।

ऑडिओ व्हिडिओ –

पत्नीधर्माचे स्तोत्र

चांगुणादेवी सांगितले । इतरेजणीं परिसले
मनोभावे पाळिजे । पत्नीधर्म ।। १

आइकावे स्त्रिये समस्त । जहाल वा नेमस्त
बाणवावी अंगी शिस्त । संसारसागरी ।। २

इये नगरीच्या तळी । घेऊनी हाती पळी
नररत्नांचा बळी । घ्यावा कैसा ।। ३

विवाहात सुरूवात । लावावी आपुलीच वात
संसार गान गात गात । अखंडचि ।। ४

सोडू नये तयास मुक्त । हेचि संसाराचे सूक्त
करावे झगड्यासि उद्युक्त । चांगुणा म्हणे ।। ५

आपण पत्नी म्हणून तो पती । व्हावी त्यास उपरती
आपणाविन त्या नाही गती । समजावे ।। ६

ऐसा या भवसागरी । भरी पाणियाच्या घागरी
बघावे हात घेऊन कटिवरी । जाणियजे ।। ७

घागरी असो कामाच्या । अथवा असो दामाच्या
कटिवरी हात तो स्वतःच्या । निरखावे ठेऊनी ।। ८

बनवावे त्यास शामळू । असेल कितीही कामसाळू
बनोनि मग कनवाळू । त्यास उद्धरावे ।। ९

कवणे केला असता संसार । त्यासारखा कामचोर
मोर समोर स्वतः लांडोर । समजू नये ।। १०

कधी काढावी उणी दुणी । खरीखोटी कोण जाणी
पळून गेली असती कुणी । ऐकवावे ।। ११

मधून मधून झगडावे । संसार वन्हीस चेतवावे
लायनीत त्या ठेवावे । रीतसर ॥ १२

निमित्त वादावादीस शोधावे । संदर्भ जुने खोदावे
उकरून जेरीस आणावे । अधूनमधून ॥ १३

प्रसंग आठवावे जुनेपुराणे । बोल लावावे त्यास दिवाणे
वाजवीत तेच तुणतुणे । रहावे नित्य ॥ १४

उकरावी ती भांडणे । त्यावाचून न गाऱ्हाणे
जणू वाचून काढावी पुराणे । अध्येमध्ये ॥ १५

काढावे डोळ्यातून कुसळ । भासवावे त्यास मुसळ
नवनीत काढावे घुसळ । भांडणाचे ॥ १६

कित्येक न केलेल्या चुका । पदरी घालाव्या त्या फुका
बसेल बिचारा मुका । ऐसे करावे ॥ १७

कंट्रोल ठेवावा निज हाती । समजवावी त्यास नातीगोती
लाभाविण न होई प्रीती । जाणवावे ।। १८

घ्यावा हाती तो पगार । कापून टीडीएस करावे गार
लाड करू नाही फार । अन्यथा शेफारे ।। १९

बनवावे त्या कठपुतळी । बनून बाँब जणू सुतळी
अन्यथा केरात जाई मुसळी । जाणिजे गं ।। २०

सावित्री आणी सत्यवाना । वडझाडाला पूजताना
हाचि हवा सात जन्मा । सतवावया ।। २१

जन्मी पुढील नको नवा । हाच हाच परत हवा
परत परत कोण एफर्ट तेधवा । करील? २२

या जन्मीच देई शिकवण । पुढील जन्मी नको विस्मरण
सात जन्मी राहे आठवण । ऐसे करीशी ।। २३

ऐसा तू माझा दातारू । तुजविण कोण मज उद्धारू
सांगावे मात्र जरत्कारू । बिनधास्त ।। २४

बावळट अति पती जात । यास खरे समजून जात
बसति मनी मांडे खात । बसू द्यावे ।। २५

तोवरी करून वटसावित्री । सातजन्मीची सोय करि ती
तीच जाणावी स्मार्ट जगती । जाया भार्या ।। २६

सर्व नवरे म्हणती समान । हे सत्य, न मिथ्या जाण
सांभाळून ठेवी आपला गुमान । अतिरेकी ।। २७

नवऱ्यानवऱ्याचिया जाती । कुणी मोठे कुणी छोटीपाती
ताटावर बसूनिया खाती । भरपेट ।। २८

समजून ये ते दुर्बळू । बहुत व्हावे ते कृपाळू
फदफदे ते अळू । करूनि घालावे ।। २९

पुरवावे चोचले जिभेचे। मग स्व जिभेवर सरस्वती नाचे
उमटले जरी अंगावरी पोचे। काळजी नसावी ॥ ३०

तया आळशियांच्या जाती। खाऊनी उठूनी जाती
न आवरणे आपुल्या ताटी। आलस्य एक ॥ ३१

दिनकार्ये तो थकतो ते सत्य। पण बिल्कुल न सांगावे नित्य
स्तुती न करण्याचे पथ्य। पाळावेचि ॥ ३२

चांगला म्हणणे डेंजरस अति। स्तुती करणे जणू खाणे माती
ऐकावी पत्नी धर्माची महती। म्हणूनीच ॥ ३३

स्तुती करावी माहेराची। अन्यथा योजना सासुराची
तमा असत्य वा सत्याची। तेथ न बाळगावी ॥ ३४

ऐसे केल्याचे मिळते फळ। टाकून बसावा जणू गळ
असावा डाव्या हातचा मळ। स्वतःसाठी ॥ ३५

अति कठीण हा पत्नी धर्म । प्रेम असताही कठोरकर्म
परि हेचि सुखाचे असते वर्म । जाणिशी तू ।। ३६

मनी असावी इतकी प्रीती । तरीही न सोडावी ही नीती
पत्नीधर्माची हीच रीती । समजावी ।। ३७

पत्नीधर्म तो काय वर्णावा । पत्नीधर्म काय जाणावा
पत्नीधर्म तो जगावा । निरंतर ।। ३८

पत्नीधर्म स्तोत्र ज्या करिती पठण । त्यांच्या सौख्यास नाही मरण
संसार सुखाचे हे कारण । असे ते जाणा ।। ३९

इति कथितसे चांगुणादेवी । सर्व पत्नीवर्गा सुखात ठेवी
पत्नीधर्म कथा परिसावी । नित्यनेमे ।। ४०

**।। इति श्री चांगुणादेवी विरचित पत्नीधर्म स्तोत्रं संपूर्ण ।।**

# एका शर्यतीची गोष्ट

ऑडिओ व्हिडिओ –

एका शर्यतीची गोष्ट भाग - १

एका शर्यतीची गोष्ट भाग - २

मी राहायचे तिकडची घरे तशी लागून होती आणि त्यांना मिळून एक सामायिक अंगण होते. घराबाहेरच्या अंगणात खेळ रंगात आला की पोरापोरींचा आवाज चढत जाई. जोरदार किंकाळ्या आणि आरडाओरडा यांनी आवार दुमदुमून जाई. पोरंच ती. असला गलका करायचीच. मग त्यात कसले कसले खेळ असत. पकडापकडी नि आबाधुबी.. पोरं जीव तोडून धावत सुटत. पकडायला येणारा कुणी कच्चा लिंबू असला की बाकीच्यांना चेव येई. मग त्याला नुसता गोल गोल धावायला लावत बाकी पोरं मजा बघत त्याची. आबाधुबीतला बॉल कोणाकोणाच्या पाठी शेकून काढी. पोरांना कधी लपाछपी खेळायचा उत्साह येई तर कधी कबड्डी. सर्वात पोरांच्या आवडीचा खेळ म्हणावा तर ब्याटबॉल. कुठल्याही फळकुटाची बॅट चाले त्यांना नि त्याने आपल्याकडचा एकुलता एक बॉल पिटत सुटत पोरं. ते खेळताना मग कुणी कुठल्या क्रिकेटरची स्टाईल मारेल तर कुणी कुठल्या. त्यातही मग ज्याची

ब्याट किंवा बॉल तो दोनदा आऊट तर आऊट म्हणवला जाई. कधी पोरांना फुटबॉल खेळायचा मूड येई.. तर कधी बॅडमिंटन. पोरं खूप सारी पण साधने खेळण्याची कमी. कुणाकडे रॅकेट असलीच तर शटल अजून कोणाकडे. कधी पोरांना नुसतेच बसून गप्पा मारण्याचा मूड असे. त्यात त्यांच्या शाळेपासून ते नवीन सिनेमा.. गाणी.. नवीन सिनेमानटांपासून शाळेतल्या शिक्षकशिक्षिकांपर्यंत चर्चा चालत. कुणी कालच्या टीव्ही सीरियलबद्दल चर्चा करे तर कुणी आपल्या मोठ्या भावाला किती ताकद आहे याच्या बढाया मारीत बसे. मुली असल्याच तरी संख्येने थोड्या असत. त्यांचे खेळ तसे थोडे वेगळे.. चिप्पी नाहीतर दोरीवरच्या उड्या.. कधी सागरगोटे.. त्यांच्या बोलण्यातले विषयही वेगळे असत. एखाद दुसरीच टॉमबॉईश असेल जी पोरांच्या बरोबर त्यांचे खेळ खेळत असे. त्यातही पोरांना टफ फाईट द्यायची या उद्देशाने त्या खेळत. शाळेत होते मी तेव्हा हे सारे पहायची सवय होती. निवृत्तीनंतर रिकाम्या वेळात या सगळ्यांना लांबून पाहणे ही एक वेगळीच मजा होती. मी रोज त्या बाकड्यावर बसून बघत असे. माझ्या वयाचे तिथे जास्त कुणीच नव्हते. त्याने माझे जास्त काही बिघडे असे नाही. पहिल्यापासूनच तशी मला एकट्याने रहायची अन एकट्यानेच सारे पहात बसायची सवय. श्री.कारखानीस आणि मी लक्ष्मी. आम्ही घरात दोघेच. मूलबाळ नसल्याने आधी लोकांच्या

टोमण्यांची सवय झालेली. मग ते टाळण्यासाठी एकटेपणाची. पुढे पुढे तर त्या सवयीचीच झालेली आवड. बाकड्यावर बसून राही मी. माझी काठी बाजूला ठेऊन. खेळता खेळता कुण्या मुलांना माझी आठवण आली की ते 'चॉकलेट आजी चॉकलेट आजी' म्हणून लांबूनच हाक मारीत आणि आपल्यातच मग्न होऊन खेळत राहात. हे चा ॅकलेट वाटायचे काम कारखानीसांचे. ते गेले नि मी पुढे सुरू ठेवले म्हणा. मी दुरून पाहत राही. पण बुधवार आणि शनिवार मात्र अपवाद. यादिवशी पोरं आणि चिमुकल्या पोरीही माझी वाट पाहात असत. मी आले की माझ्यामागोमाग माझ्या बाकड्याजवळ येऊन उभे राहात.. हात पुढे करून. त्याला कारणही तसेच होते. मी त्यांची 'चॉकलेट आजी' होते.. या दोन दिवशी मी साऱ्या पोरांना चॉकलेटं वाटत असे. पोरं नि पोरी गलका करत आजूबाजूला घुटमळत नि चॉकलेट घेऊन आपल्या खेळात रंगून जात. ईश्वरी दरबारातून नुकतीच आलेली ती फुले माझ्यासारखी पैलतीरी नेत्र लागलेली आजी पाहात बसे आणि त्यातच खरी गंमत होती. खेळात रंगलेली मुले पाहणे हा माझ्या जिवाचा विसावा होता.. आठवड्यात दोनदा पोरं चिकटून बसत आणि माझ्यासारखीला तो स्पर्श नातवाच्या स्पर्शाहून कमी नव्हता.

पोरांच्या खेळातल्या गंमतीजमती पाहण्यातही गंमत असे. खरे तर मला हाच एक विरंगुळा होता आणि मी त्यासाठी संध्याकाळची वाट पाहात असे. आयुष्याच्या संध्याकाळी या पोरांना बागडताना पाहण्यात एक मजा होती. पोरांच्या परीक्षा आल्या किंवा मे महिन्याच्या सुट्ट्या आल्या की पोरं येत नसत आणि मला अगदीच करमत नसे.

पण पोरं येत तेव्हा धमाल चाले तिकडे.

अशीच एक त्यादिवशीची गंमत.

शनिवार होता त्या दिवशी. म्हणजे चॉकलेटचा वार. दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जवळच्या दुकानातून मोठे डबे मागवीत असे मी चॉकलेट आणि गोळयांचे. शक्य तितके वेगवेगळ्या प्रकारचे.. म्हणजे वेगवेगळ्या रंगांचे नि चवींचे. त्यातून मग काही चॉकलेटं पिशवीत घालून घेऊन जात असे बुधवार आणि शनिवारी. त्यादिवशीही तसेच झाले. पोरं जमली. माझ्या झोळीतली चॉकलेटं वाटत बसले मी. चॉकलेटं चघळत पोरं निघून गेली नि आपल्या खेळात दंग झाली. पोरांच्या खेळातही एक पद्धत होती. दुबळयास शक्तिशाली कसा नमवतो याचे प्रात्यक्षिक तिथे दिसे.

..आणि त्यादिवशी त्याच दुबळ्याने कशी चतुराईने त्यावर मात केली हे ही दिसले. आजही विचार केला तर त्या अजब तर्कशास्त्राची गंमत वाटते.

म्हणजे झाले ते असे..

त्यादिवशी सारीच मोठी पोरं होती खेळायला. मोठी म्हणजे पाचवी सहावीतली असावीत. एकटा एक दुसरीतला असावा असा कच्चा लिंबू. तो मोठ्या मुलांपैकी एकाचा म्हणजे दिन्याचा धाकटा भाऊ मन्या. दोघांचे एकमेकांशी जमत नसे नि एकमेकांच्या वाचून त्यांना करमत नसे. बहुधा मन्या त्याच्या मित्रांबरोबरच खेळत असे पण त्यादिवशी त्याच्या बरोबरीचे कुणीच नव्हते. येतानाच त्याला बोलताना ऐकलेले मी.. 'ए दिन्या दादा.. माला घे ना तुमच्यात खेळायला.' दिन्या मोठ्या भावासारखा त्याला सांगत होता.. 'मन्या.. आम्ही मोठी मुलं खेळत आहोत ना.. त्यात कच्चा लिंबू काय कामाचा?'

चॉकलेटं घेऊन पोरं परत गेली खेळायला. आज त्यांचा मूड गप्पा मारायचा असावा. त्यात सारे दंग झालेले. मन्या नुसताच आशाळभूतपणे वाट पाहतोय.. कुणी खेळायला सुरूवात करेल तर.

लांबून वाटत होतं मला की मुद्दाम पोरं खेळायचं टाळताहेत. मन्याला रडकुंडीस आणायला. तसे चॉकलेट देताना मी सुनीलला काही बोलताना ऐकलेही होते. दिन्या आणि सुनीलने यावर एक दुसऱ्यांना टाळयाही दिलेल्या पाहिल्या होत्या मी. पोरं गप्प बसली नव्हती नि खेळत ही नव्हती. मध्ये मध्ये दिन्या नि सुनील मन्याकडे हळूच बघून घेत आणि परत नवीन काही विषय काढत. मन्याला त्रास देण्याचाच प्लॅन असावा त्यांचा.  शेवटी मन्याचा संयम संपला. उठून तो ओरडला..'दिन्यादादा आता खेळला नाहीस तर आईला नाव सांगेन. आणि कट्टी पण घेईन.'

मन्याच्या त्या धमकीने पोरं फिदीफिदी हसू लागली खरी पण त्यामुळे मन्या अधिकच चेकाळला आणि पाय आपटत थयथया नाचू लागला. पोरं अजूनच हसू लागली..

शाळेत असताना नि नंतरही इतक्या वर्षांत या बाकड्यावर बसून.. या पोरांच्या दुनियेतले काही नियम मला समजले होते. एकतर मुले.. म्हणजे कोणीही लहान मूल .. स्वतःला लहान समजत नाही. म्हणजे कोणापेक्षा तरी स्वतःस मोठेच समजतात ती. लहानपण देगा देवा आपल्यासारख्यांना भले वाटत असेल पण या पोरांना मात्र लहान रहायचे नि व्हायचे नसते. त्यामुळे दहावर्षाची

पोरं पाच सहा वर्षाच्या मुलांना कच्चा लिंबूच समजतात.. आणि त्यांच्यापेक्षा मोठी म्हणजे दहावीतली वगैरे या नुकतीच दशकपूर्ती झालेल्यांस लहान बालक समजतात. त्या नियमानुसारच सारे सुरू होते, मन्याच्या थयथयाटाकडे दुर्लक्ष करत. इतक्यात त्यातील अनिल उठला नि म्हणाला, 'चला रे खेळू!'

सारी पोरं गप्पांच्या तंद्रीतून बाहेर आली आणि अनिल म्हणजे अन्याकडे पाहू लागली.

'अरे मन्या रोज येतो काय आपल्यात खेळायला? कधीतरीच तर येतो ना.. त्याच्यासाठी तरी खेळू चला.'

मी दुरून पाहात होते. सुनील त्याला खेचून खाली बसवू पाहात होता. दिन्या सुनीलकडे हा अन्या 'च' आहे अगदी अशा नजरेनी बघत होता. आणि अन्याने तितक्यात त्यांना डोळा मारला.. माझ्या नजरेतून सुटले नाही ते. नक्कीच काही बिलंदरपणा सुचलेला दिसतोय बेट्यांना.. बघू काय होतंय म्हणून बसले.

इकडे मन्या खूश झालेला. आपले ते नृत्य थांबवत 'चला ना खेळूया' म्हणत पुढे झाला.

अन्याच्या डोक्यात काही प्लॅन शिजला असावा.. म्हणाला.. 'चला आपण रेस रेस खेळू..'

पोरं म्हणाली, 'चालेल..'

मग त्यांची चर्चा झाली.. रेसचे नियम झाले.. मी बसले होते तिथपासून लांबवरच्या आंब्याच्या झाडास हात लावायचा.. जो पहिला तो जिंकला. मन्या सगळ्यात छोटा. बहुधा लाडकापण असणार घरात ज्या पध्दतीने त्याने तो पदन्यासाचा थयथयाट केला त्यावरून तरी तसे वाटत होते. त्याला हरवण्यासाठी आणि चिडवण्यासाठी असणार सगळा बेत. मग पोरं परत माझ्याकडे आली..

"चॉकलेट आजी .. आम्ही रेस खेळतोय.. मी हैना जिंकणारे.." मन्या म्हणाला माझ्याकडे येता येता. मग बाकी पोरं आली. परत ती शर्यत नि त्याची  नियमावली झाली..

"जो हैना त्या आंब्याच्या झाडाच्या लायनीपरेंत पैला पोचेल तो जिंकला.." मन्याने रूल नंबर एक सांगितला.

मला गंमत वाटली. त्याच्याकडून अजून काही समजून घ्यावे म्हणून म्हटले.. "आणि शेवटी येणारा काय रे? जिंकला की हरला?"

मन्या एक सेकंद विचारात पडला. नि म्हणाला, "मला नाय म्हाईत .. नेमी मीच जिंकतो म्हंजे आजपण मीच जिंकणार.. हो की नाही.." तो पुढे दादा म्हणणार असावा पण दिन्याला त्याच्याकडे चिडवण्यासारखे हसताना पाहून म्हणाला, "हो की नाही आजी.."

"होय तर.." मी म्हणाले.

तसा काहीतरी मोठी गोष्ट समजावून सांगावी तसा मन्या म्हणाला, "आजी .. जो जिंकत नाही ना तो हारतो आणि जो हारत नाही तो जिंकतो.."

"अस्संका?" मी कौतुकाने म्हणाले.

"आणि हैना.. जो लास्ट जाईल ना तिकडे तो हरला.."

त्याने नियम समजावून सांगितले. बोलताना काहीतरी अती महत्त्वाचे सांगतोय असे भाव होते मन्याच्या तोंडावर.

"आणि आजी .. तुमी अंपायर.." मन्याने माझी त्या पदावर नेमणूक करून टाकली. पोरं खेळायची त्यात माझा असा हा पहिलाच सहभाग. या वयात कुणाला उपयोगी पडण्याचा आनंदच वेगळा! ते आंब्याचे झाड मी बसले त्याच्या विरूद्ध बाजूस तरी मी इतक्या दुरून अंपायर झाले! चश्मा डोळयांवर चढवून बसले. जणू काही मला ती फिनिश लाईन दिसणारच होती. क्रिकेटमधल्या अंपायरसारखी उभी राहणार होते पण पोरंच म्हणाली, "अंपायर चॉकलेट आजी, तुम्ही बसून पाहिलेत तरी चालेल."

सगळी पोरं मग माझ्या बाकड्याजवळ लायनीत उभी राहिली. सुनील, अनिल दिन्या आणि त्यांच्या बरोबरचे हर्षल, आरव, काव्य

आणि भाग्य. आजकाल नावं कशी ठेवतात नाही? भाग्य.. ध्यान.. श्लोक.. वेद.. वगैरे. आमच्यावेळी असलं नव्हतं काही. मी लक्ष्मी .. बाकी आमच्यावेळी भावांची नावे असलीच.. विष्णू.. शंकर वगैरे देवादिकांची. आमच्या पालकांना त्यानिमित्ताने नामस्मरणाचे पुण्य हवे असे की काय न कळे आम्हाला हाक मारता मारता!

शर्यत सुरू होणार होती. मुलं लायनीत उभी. मन्या साऱ्यांपेक्षा छोटा. पण उत्साह असा की हा आता जिंकणेच बाकी अजून. लायनीच्या दोन पावले पुढे जाऊन उभा होता तो. तर सगळी पोरं 'चीटिंग चीटिंग' म्हणून त्याला मागे खेचू लागली. मी अंपायरचे बेअरिंग घेत म्हणाले, "मन्या स्टॅंड प्रॉपरली." मन्या शहाण्यासारखा उभा राहिला. मी मग म्हणाले.. "ऑन युवर मार्क.. गेट सेट.." आणि.. "गोsss.."

पोरं धूम पळत सुटली. मन्या अर्थातच त्यात लिंबू टिंबू. कितीही धावला जोरात तरी त्याच्याहून दुप्पट मोठ्या पोरांशी कशी करणार होता स्पर्धा?

पोरं सुसाट निघाली. मन्याने अंदाज घेतला आणि एकाएकी वेग कमी करून चक्क चालू लागला तो. शर्यत संपली. अन्या

पहिला आला असावा. मी अंपायर असले तरी मला त्याचा अंदाज येणे कठीणच होते. मन्या अजूनही त्या झाडापर्यंत पोचलाच नव्हता. तो मध्येच थांबून राहिला. म्हणजे त्याने शर्यत सोडून दिली?

सारी मुलं परत येऊ लागली तसा मन्यादेखील माझ्याकडे येऊ लागला.

येताना मन्या जिंकल्याची 'व्ही' खूण करत होता. जणू तोच जिंकला असावा! येता येता ओरडला.. "आजी मी जिंकलो.. मी जिंकलो."

लहान आहे.. त्याचे मन का मोडा म्हणून म्हणाले, "वा छान!"

तेवढ्यात बाकी पोरं आली. मन्याला रडकुंडीस आणण्याचा त्यांचा बेत असफल होत होता की काय म्हणून अन्या म्हणाला, "आजी मीच जिंकलो.. मी फर्स्ट.."

"तू फर्स.. पण जिंकलो मीच.. हो की नाय?" मन्या म्हणाला..

"ए, चिटिंग.. तू तर अर्धवट पळून गेला.. हो ना आजी अंपायर.." दिन्या म्हणाला.

मन्या मात्र आपल्या हेक्यावर कायम होता.. 'मीच जिंकलो, मीच जिंकलो' म्हणत..

मला त्याची गंमत वाटली. पण माझी साक्ष काढत तोच म्हणाला, "होय की नाही हो चॉकलेट आजी?"

मी म्हटले.. "कसा काय रे तू जिंकलास?"

"आजी .. आपला रूल काय्ये? मी सांगलेला ना.. जो हारला नाही तो जिंकला.."

"मग? म्हणून तू जिंकलास?"

"आजोबा.. जो शेवटी लायनीवर जाईल तो हारला.. म्हंजे हारला तो आरव.. मी लायनीवर गेलाच नाय तर मी हरणार कसा?"

"वारे वा! तू रेस अर्धी सोडलीस आणि म्हणतोस जिंकलास म्हणून.." एक जण म्हणाला.

"चिटिंग.. चिटिंग.." दुसरा म्हणाला

"जाऊ दे रे.. मन्या कच्चा लिंबू आहे.." दिन्याच असे म्हणाला तसा मन्या चिडला..

"तूच कच्चा लिंबू .. कच्चा कैरी आणि कच्चा पेरू.. मी सांगलेलं चॉकलेट आजीला.. जो लास्ट तो हारला आणि जो हारला नाय तो जिंकला.. मी नाय हारला म्हणून मीच जिंकला.. मी जिंकला.." म्हणून तो नाचू लागला.

मी साग्रसंगीत बक्षीस समारंभ घडवून आणला तिथे. काही चॉकलेट लपवून ठेवायची माझी पद्धत होती. कित्येकदा काही दांडगट पोरं लहान मुलांना न देता सारी चॉकलेटं नेत. मग त्या लहानग्यांचे रडवेलं तोंड कसेसे वाटे म्हणून माझ्या पिशवीत एक चोरकप्पा होता. त्यात काही चॉकलेटं मी लपवून ठेवत असे. असा कुणी छोटा आला तर त्याच्या हाती ठेवायला. त्या रिझर्व स्टॉकमधली चॉकलेटं मी काढली. शर्यतीचा विजेता म्हणून अनिलला नि नंबर दोन म्हणून काव्यला दोन दोन चॉकलेटं दिली.. आणि शेवटी घोषणा केली.. पहिला आणि दुसरा यानंतर आजची शर्यत जिंकली ती मन्याने.. असे म्हणून त्याला उचलून कडेवर घेतले मी आणि त्याच्या खिशात दोन चॉकलेटं ठेवून दिली. बाकी काही उरलेली इतरांना वाटून दिली.

त्या चॉकलेटचा परिणाम की काय कोणास ठाऊक.. पोरं शर्यत विसरली.. मन्याला चिडवायचे विसरली..

अंधार झाला रे पोरांनो.. घरी जा.. आई वाट पाहतेय.. मी म्हणाले आणि माझ्या शब्दास मान दिल्यासारखी पोरं घरी परतू लागली. मी पाहिले तर मन्या ती गोळी चघळत होता आणि दिन्या त्याचा हात धरून त्यांच्या घराकडे परतत होता. एकाएकी मन्या

थबकला.. आपला हात दिन्याच्या हातून सोडवत म्हणाला, "चॉकलेट आजी टाटा.."

त्याला टाटा करून मीही निघाले..

घरी आले तरी मन्याचे ते तर्कशास्त्र पाठ सोडत नव्हते. मन्याचे तर्कशास्त्र अजब होते पण सहा वर्षाच्या मुलाच्या दृष्टीने त्यात खरी गंमत होती. लायनीवर शेवटी पोहोचणारा हरेल म्हणून हा पठ्ठ्या लायनी आधीच थांबून राहिलेला.. तेही काही एक ठरवल्यासारखा! पोरगा उद्या वकील होणार वाटते! मुलांचे पाय पाळण्यात दिसतात ते असे!

आज काही वर्ष झाली या गोष्टीस. मन्या आता मोठा झालाय. आणि त्याच्याहून लहान मुलांना सतावत असतो.. अजूनही कधी त्यांची शर्यत लागते.. मन्या आज ते स्वतःचे लॉजिक विसरला असेल पण शर्यत म्हटली की हटकून मला त्या गोष्टीची आठवण येते!

मला तरी अजूनही सुचत नाही काही मन्याच्या तर्कशास्त्रावर उत्तर. कसा खोडून काढावा तो मन्याचा युक्तिवाद?


कारखानीस म्हणजे माझे यजमान जाऊन आता चार वर्ष होत येतील. कॅन्सरच्या शर्यतीत सर्व उपचाराअंती फिनिशलाईनला पोहोचून ही ते हरले. मी एकटीच मागे उरले. आता आयुष्याच्या शर्यतीत धावतेय. अजून शर्यत सोडली नाही म्हणून फक्त हरले नाही म्हणायचे. एकटेपणा खायला उठतो. रिकाम्या घराच्या भिंती टक लावून बघण्यावाचून दुसरे काय आहे आता हातात? आता शर्यत जिंकली काय की हरली काय.. मन्याचे वय चांगले. म्हातारपण हे दुसरे बालपण म्हणतात, पण या बाबतीत तरी ते खरे नाहीच. लहानपणच्या निरागसतेने शर्यतीचे हवे तसे नियम बनवण्याची मुभा आता या वयात थोडीच मिळणार आहे? ही शर्यत अशीच.. कधी न जिंकण्यासारखी.

.. कधी वाटते, आयुष्याची शर्यतही मन्याच्या त्या शर्यतीसारखीच असती तर!

डॉ. नितीन मोरे यांची २९ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.











































राग दरबारी


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच


आधुनिक कहाण्या










डॉ. नितीन मोरे
घरात


डॉ. नितीन मोरे


सांगतो ऐका


डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे




डॉ. नितीन मोरे

## ई साहित्य प्रतिष्ठानला तेरा वर्षं पुर्ण होत आहेत.
## डॉ. नितीन मोरे यांचे हे तिसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी

पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३०), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) पंकज कोटलवार(२) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत.

त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ''इ''यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।